रायगड, नवी मुंबई
# रामप्रहर
◆ वर्ष १५ ◆ अंक २७७
www.ramprahar.com
बुधवार, २६ एप्रिल २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## देशातील पहिल्या वॉटर मेट्रोचे पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन



**कोची** : भारतातील पहिली वॉटर मेट्रो केरळमध्ये सुरू झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मंगळवारी (दि. २५) या सेवेचे उद्घाटन करण्यात आले. बॅटरीवर चालणारी ही इलेक्ट्रिक हायब्रिड बोट कनेक्टिव्हिटीसाठी महत्त्वाची मानली जात आहे. या मेट्रोचे वैशिष्ट्य म्हणजे ती १० बेटांना जोडणारा प्रवास करणार आहे. कोची मेट्रो रेल लिमिटेडचे एमडी लोकनाथ बेहेरा यांनी या प्रकल्पाबाबत माहिती देताना सांगितले की, कोची वॉटर मेट्रो हा खास प्रोजेक्ट असून वाहतूक व्यवस्थेत मोठा बदल घडवणारा आहे. कोची हे शहर अनेक बेटांनी वेढलेले आहे. यापैकी १० बेटे महत्त्वाची असून त्यावर लोकसंख्याही जास्त आहे. या बेटांवर राहणाऱ्या ज्या लोकांना आपल्या विविध कामांसाठी कायम कोची शहरात यावे लागते त्यांना या आरामदायी वॉटर मेट्रोची सुविधा अगदी कमी खर्चात वापरता येईल.


### अंतरंग
मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना शेतकऱ्यांना उपयुक्त/२
कोलाड येथे अवैध मद्यसाठा जप्त; दोघे जेरबंद/५
डब्ल्यूटीसी फायनलसाठी टीम इंडियाची घोषणा/८


# बारसू प्रकल्पावरून दुटप्पी राजकारण

### उद्योगमंत्री उदय सामंतांचा राजकीय विरोधकांवर हल्लाबोल

### उद्धव ठाकरेंनी पंतप्रधानांना लिहलेले पत्र उघड



**मुंबई : प्रतिनिधी**

रत्नागिरी जिल्ह्यातील प्रस्तावित बारसू रिफायनरी प्रकल्पासाठी परिसरात भू सर्वेक्षण सुरू झाल्यानंतर ठाकरे गटाने या रिफायनरीला विरोध दर्शविला आहे. या पार्श्वभूमीवर उद्योगमंत्री उदय सामंत यांनी मंगळवारी (दि. २५) मुंबईत पत्रकार परिषद घेत उद्धव ठाकरे यांनीच बारसू प्रकल्प सुरू करण्यासाठी केंद्र सरकारला लिहलेले पत्र सर्वांसमोर आणले. जे बारसू प्रकल्पाला विरोध करीत आहेत त्यांनीच १२ जानेवारी २०२२ रोजी हे पत्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाठवले होते असे सांगत आताही या प्रकल्पाबाबत ठाकरे गटाकडून दुटप्पी राजकारण सुरू आहे, असा हल्लाबोल मंत्री सामंत यांनी या वेळी केला.

या पत्रात उद्धव ठाकरे यांनी म्हटले होते की, रिफायनरीसाठी आम्ही बारसू येथे १३०० एकर जमीन व नाट्यामध्ये १३४४ एकर जमीन देऊ शकतो. या जमिनीपैकी ९० टक्के जमिनीवर घरे, मानवी वस्ती नाही. झाडी नाही, वाडी नाही. त्यामुळे प्रकल्पामुळे कुठलेही घर किंवा वाडी विस्थापित होणार नाही. (पान २ वर..)

### रिफायनरी होणारच! आता माघार नाही -उपमुख्यमंत्री



**बंगळुरू** : कोकणातील बारसू येथील रिफायनरी प्रकल्प नियोजित ठिकाणी होईल. महाराष्ट्रासाठी आम्ही प्रकल्प पूर्ण करणारच, अशी स्पष्टोक्ती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. आंदोलकांच्या शंकांचे निरसन करू, असेही त्यांनी कर्नाटक दौऱ्यावर असताना म्हटले.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, हा प्रकल्प पर्यावरणपूरक असून त्यामुळे निसर्गाला कोणताही धोका नाही. आम्हाला हा रिफायनरी प्रकल्प प्रतिष्ठेचा विषय करायचा नाही, तर महाराष्ट्राचा विकास करायचा आहे. या प्रकल्पामुळे प्रत्यक्षपणे एक लाख लोकांना रोजगार मिळणार आहे, मात्र रिफायनरीविरोधात अपप्रचार सुरू असून त्यातून विरोध होत आहे. महाविकास आघाडीचे सरकार असताना रिफायनरी प्रकल्पासाठी बारसू या जागेसाठी त्यांनी केंद्र सरकारला पत्र लिहिले होते. आता मात्र त्यांची भूमिका विरोधाची आहे.

### कर्नाळा खिंडीत शिवशाही बसचा अपघात

## एकाचा मृत्यू, २५ प्रवासी जखमी



**पनवेल : वार्ताहर**

मुंबई-गोवा महामार्गावरील पनवेल तालुक्यातील कर्नाळा खिंडीत मंगळवारी (दि. २५) एसटी महामंडळाची शिवशाही बस उलटून एकाचा मृत्यू, तर २५ प्रवासी जखमी झाले आहेत. जखमींना विविध रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आले आहे.

अपघातग्रस्त शिवशाही बस (एमएच ०९ इएम ९२८२) पनवेलहून महाडच्या दिशेने निघाली होती. कर्नाळा खिंडीतील तलावाजवळ चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ही बस उलटली. या बसमधून ३८ प्रवासी आणि चालक व वाहक असे एकूण ४० जण प्रवास करीत होते. या अपघातात दिप्तेश मोरेश्वर टेमघरे (३१, रा. अष्टमी, ता. रोहा) यांचा मृत्यू झाला असून २५ प्रवासी जखमी झाले आहेत.

या अपघाताची माहिती मिळताच पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे पथक तसेच पळस्पे वाहतूक पोलीस शाखेच्या वरिष्ठ निरीक्षक स्मिता जाधव यांचे पथक घटनास्थळी दाखल होत त्यांनी मदतकार्य सुरू केले. या वेळी अपघातातील जखमींना रुग्णवाहिकेमधून पनवेल उपजिल्हा रुग्णालय तसेच कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले.

दरम्यान, याच मार्गावर एका रेनॉल्ट्स कंपनीच्या कारचाही अपघात झाला होता. या अपघातांमुळे काही काळासाठी वाहतूक कोंडी झाली होती.

# कामोठ्यात महाआरोग्य व रक्तदान शिबिरास प्रतिसाद | आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन






**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कामोठे येथील रविशेठ जोशी चॅरीटेबल ट्रस्टच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम सातत्याने राबविण्यात येतात. त्यानुसार ट्रस्टतर्फे स्व. मितेश जोशी यांच्या स्मरणार्थ कामोठे येथील साई समर्थ हॉस्पिटलच्या सेवेंतर्गत मोफत महाआरोग्य व रक्तदान शिबिर मंगळवारी (दि. २५) आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते आणि महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या उपस्थितीत झाले.

कामोठे सेक्टर ३६ येथील मसाला मंत्रा येथे झालेल्या या शिबिरास भाजप कामोठे शहर अध्यक्ष रविशेठ जोशी, माजी नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, रायगड मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. अरुणकुमार भगत, सतिश पाटील, गोपीनाथ भगत, माजी नगरसेविका कुसूम म्हात्रे, अरुणा भगत, पुष्पा कुत्तरवडे, भटके विमुक्त आघाडीच्या जिल्हा अध्यक्ष विद्या तामखेडे, महिला मोर्चा शहर अध्यक्ष वनिता पाटील, युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, युवा नेते हॅप्पी सिंग, युवा मोर्चाचे कामोठे शहर अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, भाजप नेते प्रदीप भगत, रमेश तुपे, भाऊ भगत, अशोक मोटे, जयेंद्र जोशी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते. (पान २ वर..)

## निवडक

### केनियात अंधश्रद्धेपोटी तब्बल ७३ जणांचा मृत्यू

**नैरोबी :** अंधश्रद्धेपोटी ७३ जणांनी जीव गमावल्याची घटना केनियातील मालिंदीच्या किल्फी प्रांतामध्ये उघडकीस आली आहे. पाद्रीच्या मालकीच्या जमिनीत खोदकाम करून पोलिसांनी आतापर्यंत ७३ जणांचे मृतदेह बाहेर काढले आहेत. पाद्रीने त्याच्या अनुयायांना आमरण उपोषण केल्यावर देवाची भेट घडेल, असे सांगितले होते. पोलिसांनी पाद्रीला अटक केली आहे.

### पंजाबचे माजी मुख्यमंत्री प्रकाश सिंग बादल यांचे निधन



**मोहाली** : पंजाबचे माजी मुख्यमंत्री आणि शिरोमणी अकाली दलाचे ज्येष्ठ नेते प्रकाश सिंग बादल यांचे मंगळवारी (दि. २५) मोहालीतील खासगी रुग्णालयात निधन झाले. ते ९५ वर्षांचे होते. अनेक दिवसांपासून त्यांच्यावर उपचार सुरू होते.

## बांधकामाची रेती आता एका क्लिकवर, तीही स्वस्त दरात!

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील नागरिकांना स्वस्त दराने रेती मिळण्यासाठी तसेच अनधिकृत रेती उत्खननाला आळा घालण्यासाठी नवे सुधारित रेती धोरण राज्य शासनामार्फत जाहीर करण्यात आले होते. येत्या महाराष्ट्र दिनी याची अंमलबजावणी सुरू करण्यात येणार असून मोबाईल ॲपच्या माध्यमातून रेती सर्वसामान्यांना एका क्लिकवर मिळणार असल्याची माहिती महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिली.

महसूलमंत्री विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी (दि. २५) सह्याद्री अतिथीगृह येथे या विषयाबाबत बैठक झाली. या वेळी त्यांनी वनजमीन अतिक्रमणाबाबतच्या कारवाईस स्थगिती दिल्याचेही सांगितले. याशिवाय शेतकरी, आदिवासींच्या मागण्यांसंदर्भात नेमण्यात आलेल्या उपसमितीसमवेत पुढील आठवड्यात चर्चा होणार असल्याचे म्हटले.

## कोल्हापूरच्या साखर कारखाना निवडणुकीत महाडिक गटाकडून सतेज पाटलांना धोबीपछाड

**कोल्हापूर** : पश्चिम महाराष्ट्राचे लक्ष लागून राहिलेल्या कोल्हापूरमधील श्री छत्रपती राजाराम सहकारी साखर कारखान्याच्या पंचवार्षिक निवडणुकीचा निकाल मंगळवारी (दि. २५) जाहीर झाला. यामध्ये सत्ताधारी नेते महादेवराव महाडिक यांच्या गटाने विरोधी नेते सतेज पाटील व सहकाऱ्यांचा सुपडा साफ केला आहे. या निवडणुकीसाठी दोन अपक्षांसह एकूण ४४ उमेदवार रिंगणात होते, तर ९१.१२ टक्के इतके चुरशीने मतदान झाले होते. महाडीक गटाने सर्वच्या सर्व म्हणजे २१ पैकी २१ जागा जिंकल्याचे वृत्त आहे. सायंकाळी उशिरापर्यंत ही मतमोजणी सुरू होती. या निवडणुकीत विरोधकांचा कंडका पाडल्याचे महाडिक यांनी प्रतिक्रिया देताना म्हटले.

## 'रामप्रहर'चे मुख्य संपादक देवदास मटाले यांना स्व. संतोष पवार स्मृती राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार

### जिल्हास्तरीय पुरस्काराचे राजन वेलकर मानकरी



देवदास मटाले



राजन वेलकर

**कर्जत : प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या अधिस्वीकृती समितीचे सदस्य दिवंगत पत्रकार संतोष पवार यांच्या जयंतीनिमित्त स्व. संतोष पवार स्मृती पत्रकारिता पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे. यातील राज्यस्तरीय संपादक पुरस्कार दैनिक रामप्रहरचे मुख्य संपादक देवदास मटाले यांना, तर जिल्हास्तरीय पत्रकार पुरस्कार अलिबाग येथील रायगड टाइम्सचे संपादक राजन वेलकर यांना जाहीर करण्यात आला आहे. कर्जत येथे २७ एप्रिल रोजी हा पुरस्कार वितरण सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे.

माथेरान येथील पत्रकार आणि महाराष्ट्र शासनाच्या जनसंपर्क विभागाच्या अधिस्वीकृती समितीचे सदस्य संतोष पवार यांचे ९ सप्टेंबर २०२० रोजी कोरोनाने निधन झाले होते. त्यांच्या स्मृती कायम राहाव्यात यासाठी स्व. संतोष पवार स्मृती पत्रकारिता पुरस्कार देण्याचा निर्णय कर्जत प्रेस क्लबने घेतला. त्यानुसार स्व. संतोष पवार स्मृती राज्यस्तरीय संपादक पुरस्कार २०२२ हा 'रामप्रहर'चे मुख्य संपादक देवदास मटाले यांना (११ हजार १११ रुपयांचा धनादेश, समानचिन्हे, मानपत्र, शाल, श्रीफळ), तर रायगड जिल्हास्तरीय पत्रकार पुरस्कार अलिबाग येथील पत्रकार राजन वेलकर यांना (पाच हजार ५५५ रुपयांचा धनादेश, सन्मानचिन्हे, मानपत्र, शाल, श्रीफळ) देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

कर्जत येथील रॉयल गार्डनच्या वातानुकूलित सभागृहात होणाऱ्या या पुरस्कार सोहळ्यास पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे, माजी आमदार सुरेश लाड, देवेंद्र साटम प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्याचप्रमाणे ज्येष्ठ पत्रकार दिलीप मालवणकर, रायगड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष सुरेश टोकरे, माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे, नगराध्यक्ष सुवर्णा जोशी, नितीन सावंत, मराठी पत्रकार परिषदेचे कार्याध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, रायगड प्रेस क्लबचे अध्यक्ष मनोज खांबे आणि संतोष पवार यांच्या मातोश्री सुशीला धोंडू पवार, पत्नी मनीषा पवार यांची उपस्थिती असणार आहे.

## मुरूड किनारी मोटार पॅराग्लायडिंग

### पर्यटकांना पर्वणी



**मुरूड : प्रतिनिधी**

प्रसिद्ध मुरूड समुद्रकिनारी दोन दिवसांपूर्वी मोटार पॅराग्लायडिंगची सेवा सुरू झाली आहे. अनेक पर्यटक याचा आनंद लुटत असून काही आपल्या फोटो टिपत असल्याचे पहावयास मिळत आहे.

मुरूड तालुका सुपरिचित पर्यटनस्थळ असून लाखो पर्यटक येथील सुमद्रकिनारे, जंजिरा किल्ला पाहण्यासाठी येत असतात, परंतु मुरूड समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांसाठी इतर विशेष काही नसल्याने काही पर्यटक या ठिकाणी न थांबता पुढचा प्रवास करतात. यामुळे पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस कमी होऊ लागली. याचा फटका येथील व्यावसायिकांना बसत होता.

मुरूडमध्ये पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी साताऱ्यातील वाई पसरणी येथील जी.पी.ॲडव्हेंचर स्पोर्टस्च्या वतीने मुरूड समुद्र किनारी मोटर पॅराग्लायडिंग सुरू करण्यात आले आहे. यामध्ये एक पर्यटक व पायलट बसण्याची सुविधा असून ते १०० फुट उंच भरारी घेतात. यासाठी प्रति व्यक्ती दोन हजार रुपये आणि जर कुणाला संपूर्ण मुरूड शहराची हवाई सफर करावयाची असल्यास तर प्रति पाच हजार रुपये असा दर आहे.

## शालेय अभ्यासक्रमात लवकरच कृषी शिक्षण

### कृषिमंत्र्यांची माहिती



**मुंबई : प्रतिनिधी**

कृषी विषयाचा समावेश शालेय शिक्षणाच्या अभ्यासक्रमात करण्याबाबतचा प्राथमिक अहवाल मंगळवारी (दि. २५) शिक्षण विभागाने स्वीकारला आहे. याबाबत तज्ज्ञांची समिती नेमून अभ्यासक्रमाचा आराखडा निश्चित केला जाणार असल्याची माहिती कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांनी दिली.

या संदर्भातील अहवाल मंत्री सत्तार यांनी शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्याकडे सुपूर्द केला. कृषी केंद्रीत आशयामुळे शेतीचे अध्ययन होईल. शेतीकडे विद्यार्थ्यांचा ओढा वाढेल तसेच शेती व शेतीपूरक व्यवसाय करणाऱ्यांबद्दल जाणीव व संवेदनशीलता निर्माण होईल, असा विश्वास या वेळी मंत्री सत्तार यांनी व्यक्त केला.

या वेळी मंत्री सत्तार म्हणाले की, शालेय विद्यार्थ्यांना लहानपणापासून शेतीविषयक ज्ञान मिळाले तर पुढील जीवनात त्यांना त्याचे महत्त्व निश्चितच समजण्यास उपयुक्त ठरणार आहे. कृषी शिक्षणविषयक एकात्मिक आराखडा तयार करताना इयत्ता पहिली ते पाचवी, सहावी ते आठवी आणि नववी ते दहावी अशा पद्धतीने अभ्यासक्रम ठेवावा. कृषीविषयक प्रशिक्षणासाठी जे जे साहित्य आणि मदत लागेल ते उपलब्ध करून देण्याची तयारी कृषी विभागाची भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले.

*महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन परिषद आणि कृषी परिषद यांनी तज्ज्ञांची समिती नेमून अभ्यासक्रमाचा आराखडा तयार करावा. अभ्यासक्रमाची रचना करताना विद्यार्थ्यांना संबंधित विषयाबद्दल रुची निर्माण होईल या पद्धतीने असावी.*
*-दीपक केसरकर, शालेय शिक्षणमंत्री*

शालेय अभ्यासक्रमातील इतर सर्व विषयांच्या सहसंबंधातून शेतीचे महत्त्व, उपयोजना, व्यवसाय संधी, शेतीविषयक जाणीव अशा अनेक पैलूंकडे लक्ष केंद्रित करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणे शक्य होईल, असा विश्वासही मंत्री सत्तार यांनी व्यक्त केला.

या वेळी कृषी विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल, शालेय शिक्षण विभागाचे सहसचिव ई. मु. काझी, सहसचिव (कृषी) बाळासाहेब रासकर, कृषी आयुक्त सुनील चव्हाण, महाराष्ट्र राज्य कृषी परिषदेचे महासंचालक रावसाहेब भागडे, कृषी संचालक (शिक्षण) प्रा. डॉ. उत्तम कदम, संचालक (संशोधन) डॉ. हरिहर कौसडीकर, अवर सचिव उमेश चांदिवडे आदी उपस्थित होते.

## अलिबाग नागावमधील मुलीचा श्वानदंशाने मृत्यू



**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील नागाव येथे एका भटक्या कुत्राने चावा घेतल्याने जखमी झालेल्या १० वर्षीय मुलीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्यामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

नागावच्या मांद्रेकर वाडीत राहत असलेले वैभव घाडी यांची इयत्ता चौथीमध्ये शिकत असलेली मुलगी स्वरा हिच्यावर काही दिवसांपूर्वी घरासमोरील रस्त्यावर भटक्या कुत्राने हल्ला करून दंश केला होता. यात जखमी झालेल्या स्वरावर उपचार करून रेबीज लसीकरणही करण्यात आले, मात्र तिला जास्त त्रास जाणवू लागल्याने मुंबईतील कस्तुरबा रुग्णालयात हलविण्यात आले होते. तेथे उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला.

दरम्यान, नागावमधील भटक्या कुत्र्यांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून याबाबत उपाययोजना कराव्यात, अशी मागणी सर्व स्तरातून जोर धरू लागली आहे.

# मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी उपयुक्त

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे लोकार्पण कार्यक्रमात प्रतिपादन

**मुंबई : प्रतिनिधी**

शेतकऱ्यांना दिवसाही वीज उपलब्ध होण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अतिशय उपयुक्त ठरणार असून शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठीची ही 'फ्लॅगशीप' योजना सर्व जिल्ह्यांमध्ये अतिशय प्रभावीपणे राबविण्यात यावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांच्या परिषदेत मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना- २.० च्या लोकार्पणाचा कार्यक्रम झाला.

यावेळी मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, अपर मुख्य सचिव डॉ. नितीन करिर, अपर मुख्य सचिव दीपक कपूर, ऊर्जा विभागाच्या प्रधान सचिव आभा शुक्ला, प्रधान सचिव एकनाथ डवले, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक दिनेश वाघमारे, विजय सिंगल, पी.अन्बलगन, उपमुख्यमंत्री यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी, तसेच विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी उपस्थित होते. यावेळी 'मिशन- २०२५' या पुस्तिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाले.



उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, शेती आणि शेतकरी राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून राज्य शासन शेतकऱ्यांच्या पाठिशी भक्कमपणे कायम उभे आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ही शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे, कारण ही स्वस्त आणि हरित ऊर्जा आहे. क्रॉस सबसिडी कमी होण्याच्या माध्यमातून उद्योग क्षेत्रालाही ही योजना चालना देणारी ठरेल. या योजनेच्या माध्यमातून जास्तीत जास्त फीडर हे सौर ऊर्जेवर आणण्यावर भर देण्यात येणार आहे. सौर ऊर्जेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध होणारा जिल्हा करण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी प्रयत्नशील रहावे.

प्रकल्पांमध्ये जमिनीची उपलब्धता कालबद्ध होणे हे अत्यंत गरजेचे असल्याने यासाठी सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी महावितरण सब स्टेशनच्या पाच ते दहा किलोमीटरमध्ये असणाऱ्या शासकीय व निमशासकीय जमिनींची माहिती गोळा करावी. त्यातील ज्या जमिनी प्रकल्प उभारण्यासाठी सुयोग्य असतील त्या जमिनी आवश्यक ती सगळी प्रक्रिया करून या सर्व प्रकल्पांसाठी उपलब्ध करून द्याव्यात, असे निर्देशही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

ऊर्जा विभागाच्या प्रधान सचिव आभा शुक्ला प्रास्ताविकात म्हणाल्या की, वीज क्षेत्रात गेल्या दशकात मोठे बदल झाले आहेत. २०१७ मध्ये मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना नावाने भविष्याचा वेध घेणारी महत्त्वाकांक्षी योजना सुरू करण्यात आली. याद्वारे किफायतशीर सौर ऊर्जेचा फायदा औद्योगिक ग्राहकांसह शेतकऱ्यांनाही कसा करून देता येईल, याचा विचार करण्यात आला. सुरुवातीच्या काळातील या योजनेच्या अंमलबजावणीचे उत्साहवर्धक परिणाम दिसून आले आहेत.

या योजनेद्वारे शेतकऱ्यांना दिवसा पुरवठा उपलब्ध होणार असून त्यामुळे शेतकऱ्यांचा सिंचनाच्या वेळी होणारा त्रासही कमी होणार असल्याचे श्रीमती शुक्ला यांनी सांगितले.

### ■ डिसेंबर २०२५पर्यंत ३० टक्के शेतीच्या वाहिन्या सौरऊर्जेवर

*मिशन २०२५ च्या माध्यमातून मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना अजून महत्त्वाकांक्षीपणे मोठ्या प्रमाणात व वेगाने अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मिशन २०२५ द्वारे डिसेंबर २०२५ पर्यंत सर्व जिल्ह्यातील किमान ३० टक्के शेतीच्या वाहिन्या अशा प्रकल्पांद्वारे सौर ऊर्जेवर आणण्याचे उद्दिष्ट असून 'मिशन २०२५' द्वारे शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी अनेकविध प्रोत्साहनात्मक सुविधा देण्यात आल्या आहेत. त्यात शेतकरी व सौर उद्योग या दोघांसाठीही फायद्याच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. शेतकरी या प्रकल्पांसाठी जमीन भाड्याने द्यायला तयार आहेत. त्यांना दर हेक्टरी एक लाख २५ हजार रुपये दरवर्षी एवढा भाडेपट्टा देण्याची तरतूद आहे, त्यामुळे शेतकऱ्यांना खात्रीच्या उत्पन्नाचा एक मार्ग उपलब्ध होऊ शकेल.*

### सौरऊर्जेच्या संदर्भातील इको सिस्टीम तयार होणार

शेतकऱ्यांबरोबरच उद्योजकांनीही या प्रकल्पांमध्ये सहभागी होऊन वेगाने शेतकरी हिताचे प्रकल्प उभारावेत यासाठी प्रोत्साहन दिले जाईल. ज्या गावात हे प्रकल्प उभे राहतात अशा ग्रामपंचायतींना देखील पहिली तीन वर्षे पाच लाख रुपये प्रतिवर्ष असे अनुदान दिले जाईल. या सर्व उपाययोजनांमुळे ग्रामीण भागात संपूर्ण सौरऊर्जेच्या संदर्भातली इकोसिस्टीम तयार होईल.



# परशुराम घाटातील कामाची गती वाढली

**रत्नागिरी : रामप्रहर वृत्त**

मुंबई गोवा महामार्गावरील बहुचर्चित परशुराम घाट दिवसातील पाच तास बंद ठेवल्याने चौपदरीकरणाच्या कामाला प्रचंड वेग आला आहे. या घाटातील जुन्या रस्त्यावर भराव टाकून बुजवण्याचे काम सुरू झाले आहे. येत्या आठ दिवसात घाटातील अतिशय धोकादायक ठरलेल्या ठिकाणी सपाटीकरणाचे काम पुर्ण करून तातडीने कॉंक्रिटीकरणाच्या कामालाही सुरवात केली जाणार आहे.

परशुराम घाटातील धोकादायक स्थितीत असलेल्या ५०० मिटर अंतरातील डोंगर कटाई व सरंक्षण भितीस भराव करण्यासाठी २५ एप्रिल ते १० मे दरम्यान घाटातील वाहतूक दुपारी १२ ते सायंकाळी ५ दरम्यान बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. त्यानुसार मंगळवारपासून घाट बंद ठेवून कल्याण टोलवेज कंपनीने अतिशय धोकादायक असलेल्या ठिकाणी कामाला सुरवात केली आहे. त्यासाठी घाटातील जुन्या रस्त्यावर भराव टाकून दुसऱ्या मार्गाने वाहतूक सुरू ठेवण्याचे नियोजन केले आहे. त्याप्रमाणे मंगळवारी पोलिस बंदोबस्तात घाट बंद ठेवून काम सुरू केले आहे.

घाटाच्या मध्यवर्ती भागात कडक कातळ लागल्याने तो तोडताना अनेक अडचणी येत आहेत. दोन ब्रेकर मशिनने हे कातळ तोडण्याचे काम सुरू केले आहे. परंतू ते अतिशय कठिण असल्याने या कामात अडचणी येत आहेत. त्यासाठी बाजूचा कातळ फोडून तात्पुरत्या स्थितीत पर्यायी रस्ता काढला जात आहे. कातळ फोडण्यासाठी सुरुंग लावण्याची आवश्यकता आहे. परंतू घाट माथ्यावर वस्ती असल्याने त्याला अद्याप जिल्हाधिकाऱ्यांकडून मान्यता मिळालेली नाही. त्यामुळे ब्रेकरनेच कातळ फोडण्याचे काम सुरूच ठेवले आहे.

परशुराम घाटातील वाहतूक पाच तास बंद असल्याने या मार्गावरील वाहने चिरणी- आंबडस- चिपळूण मार्गे वळविण्यात येत आहेत. त्यासाठी कळंबस्ते व परशुराम घाटात पोलिस छावणी उभारण्यात आली आहे. काही अवजड वाहने परशुराम घाटाच्या पायथ्याशी उभी करून ठेवली आहे. या वाहनांची लांबच लांब रांग लागली आहे. सायंकाळी ५ वाजता घाट खुला होताच ही वाहने सोडण्यात येणार आहेत.

परशुराम घाट बंदच्या पार्श्वभुमीवर दोन्ही बाजूला फलक उभारण्यात आले आहेत. परंतू त्या व्यतिरीक्त आपत्कालीन परिस्थितीत सुचवलेल्या उपाययोजना ठेकेदार कंपनीकडून केलेल्या दिसत नाहीत. दरडग्रस्त भागात आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तेथे जेसीबी, क्रेन, पोकलेन, ॲम्ब्युलन्स, रस्सी, टॉर्च, अग्नीशामक वाहन, इत्यादी आवश्यक साधन सामग्री उपलब्ध करावी. जबाबदार अधिकाऱ्यासह पुरेसे मनुष्यबळ मदत व बचाव कार्यासाठी उपलब्ध ठेवण्यात यावे. रस्त्याच्या बाजुस रिफ्लेक्टर लावण्यात यावे, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी केल्या आहेत. परंतू अद्यापही या सूचनांचे पालन होताना दिसत नाही.

# उद्धव ठाकरे गटाचे राष्ट्रीय प्रवक्ते शैलेश पांडे भाजपमध्ये

## मीरा भाईंदरच्या दोन माजी नगरसेविकांचाही प्रवेश

**मुंबई : प्रतिनिधी**

उद्धव ठाकरे गटाचे राष्ट्रीय प्रवक्ते शैलेश पांडे तसेच मीरा भाईंदरच्या उद्धव ठाकरे गटाच्या माजी नगरसेविका स्नेहा पांडे, कॉंग्रेसच्या माजी नगरसेविका सारा अक्रम यांनी आपल्या असंख्य समर्थकांसह मंगळवारी भाजपमध्ये प्रवेश केला. भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी या सर्वांचे स्वागत केले.

भाजप प्रदेश कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला प्रदेश महामंत्री विक्रांत पाटील, माजी आमदार नरेंद्र मेहता, अमरजीत मिश्रा आदी उपस्थित होते.



शैलेश पांडे यांची भाजपाचे प्रदेश प्रवक्ते म्हणून नियुक्ती करण्यात आल्याची घोषणा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी केली.

प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करताना भारताला आत्मनिर्भर, सर्वश्रेष्ठ देश बनविण्याची संकल्पना मांडली आहे. पंतप्रधानांची ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत. घर चलो अभियानाद्वारे ३ कोटी नागरिकांशी संपर्क साधण्याचा पक्षाचा संकल्प आहे. पक्षात नव्याने प्रवेश केलेल्यांचा योग्य तो सन्मान राखला जाईल, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी उद्धव ठाकरे गटाचे सुरेश दुबे, विनोद तिवारी, संदीप शर्मा, संजय गुप्ता, विनायक पांडे, भोलानाथ गुप्ता, विनोद मिश्रा, अभिषेक दुबे आदींनी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला.

# क्षेत्रिय अधिकाऱ्यांची कार्यशाळा

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

वाउपाच्या क्षेत्रकामातून संकलित करण्यात येणाऱ्या माहितीची गुणवता वाढविण्यासाठी व क्षेत्रकामाचा दर्जा उंचाविण्याच्या दृष्टीकोनातून २०२१-२२ या वर्षाच्या क्षेत्रकामासाठी राज्यातील क्षेत्रिय अधिकाऱ्यांची तीन दिवसीय कार्यशाळा नुकतीच आयोजित करण्यात आली होती.

कार्यशाळेचे अध्यक्ष महासंचालक, यशदा एस. चोकलिंगम, (भा.प्र.से.) व प्रमुख पाहुणे म्हणून उपमहानिदेशक, औद्योगिक सांख्यिकी विभाग, राष्ट्रीय साख्यिकी कार्यालय, कोलकाता सौम्या चक्रवर्ती, राष्ट्रीय नमुना पाहणी विभागाच्या पुणे येथील क्षेत्रीय कार्यालयाचे संचालक आलोक कुमार, उद्योग विभागाचे प्रतिनिधी, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, पुणे पी. डी. रेंदाळकर, संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय विजय आहेर हे उपस्थित होते. राज्यातील प्रादेशिक सांख्यिकी कार्यालयांचे सिमा जोशी, सहसंचालक व जिल्हा सांख्यिकी कार्यालयाचे उपसंचालक श्रीमती वृषाली माकर आणि क्षेत्रकाम करणारे कर्मचारी असे एकूण १६४ अधिकारी व कर्मचारी या कार्यशाळेत सहभागी झाले होते. आभार प्रदर्शनाने कार्यशाळेची सांगता झाली.

# 'मन की बात'च्या १००व्या भागानिमित्त पुण्याच्या शर्मिला ओसवाल यांना निमंत्रण

**मुंबई : प्रतिनिधी**

शर्मिला ओसवाल यांना 'मिलेट वूमन ऑफ इंडिया' म्हणून ओळखले जाते, 'मिलेट मॉम' ही आणखी एक उपाधी त्यांना नुकतीच मिळाली आहे. 'मन की बात' कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अभिमानाने उल्लेख केलेल्या, पुण्याच्या शर्मिला ओसवाल यांना २६ एप्रिल रोजी 'मन की बात'च्या १०० भागानिमित्त प्रसार भारती, नवी दिल्ली येथे आयोजित विशेष कार्यक्रमासाठी आमंत्रित केले आहे.

### प्रसार भारतीमध्ये आज कार्यक्रम

शर्मिला ओसवाल यांच्यासोबत त्यांचा मुलगा मिलेट ॲग्रो ऑरगॅनिक फार्मिंगमध्ये स्थापनेपासून काम करणारा संस्थापक शुभम ओसवालही दिल्लीत या प्रसंगी उपस्थित राहणार आहे. अत्यंत निवडक लोकांच्या उपस्थितीत होणार्या कार्यक्रमात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह या प्रमुख अतिथी म्हणून निमंत्रित आहेत. त्यानंतर ३० एप्रिल रोजी मुंबईच्या राजभवनात राज्य पातळीवर होणाऱ्या विशेष कार्यक्रमात शर्मिला ओसवाल यांचा सन्मान होणार आहे. आपली गलेलठ्ठ पगाराची कॉर्पोरेट नोकरी सोडून तो या नव्या जोमाने या उपक्रमात सहभागी झाला.

# महानिर्मिती कनिष्ठ अभियंता, सहाय्यक अभियंता परीक्षा आजपासून

**मुंबई : प्रतिनिधी**

महानिर्मिती जाहिरात क्र.१०/२०२२ व अधिसूचना ३६७१ दिनांक २१ एप्रिल २०२३ अन्वये प्रसिद्ध करण्यात आलेल्या कनिष्ठ अभियंता व सहाय्यक अभियंता या पदांच्या सरळसेवा भरतीच्या अनुषंगाने या पदांची ऑनलाईन परीक्षा २६ ते २८ एप्रिल रोजी घेण्यात येणार आहे. परीक्षा केंद्र, ठिकाण, तारीख, वेळ इत्यादी तपशीलवार माहिती, महानिर्मितीच्या www.mahagenco.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, याची संबंधित सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

एकूण ६६१ जागांकरिता ८०४३५ उमेदवारांनी अर्ज केला असून राज्यभरातील ११८ केंद्रांवर ही परीक्षा घेण्यात येणार आहे.सहाय्यक अभियंता जागा ३३९, एकूण अर्ज प्राप्त ४३३४५. कनिष्ठ अभियंता जागा एकूण ३२२, एकूण प्राप्त अर्ज ३७०९०. एकूण अर्ज ८०४३५ आले असून २६ एप्रिल ला ६३ केंद्रे, २७ एप्रिल ला ११८ केंद्रे, २८ एप्रिल ला २८ केंद्रांवर ही परिक्षा घेण्यात येणार आहे. २६ एप्रिलला दोन सत्रांमध्ये, २७ एप्रिलला तीन सत्रांमध्ये तर २८ एप्रिल रोजी एका सत्रात परीक्षा घेण्यात येणार आहे.

उमेदवारांना त्यांच्या नोंदणीकृत भ्रमणध्वनीवर एस.एम.एस. देखील पाठविण्यात आले आहे. परिक्षेसंदर्भात काही अडचण निर्माण झाल्यास अधिक माहितीकरिता ०२२- ६९४३५०००, रसाहीील ारहरसशपले.ळप तसेच आय.बी.पी.एस. हेल्प डेस्क नंबर १८००१०३४५६६ यावर संपर्क साधावा.

महानिर्मितीची भरती प्रक्रिया गुणवत्तेच्या आधारावर पारदर्शकपणे केली जाते. उमेदवारांनी त्यांना कोणीही व्यक्ती, नोकरी मिळवून देतो असे आश्वासन देत असल्यास त्यांच्या भूलथापांना किंवा आमिषाला बळी पडू नये, कुठलाही गैरप्रकार निदर्शनास आणून दिल्यास महानिर्मितीतर्फे तातडीने उचित कारवाई करण्यात येईल, असे महानिर्मितीचे कार्यकारी संचालक (मानव संसाधन) डॉ.धनंजय सावळकर यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

पान १ वरुन

## बारसू प्रकल्पावरून दुटप्पी राजकारण

याचबरोबर या प्रकल्पामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही. या प्रकल्पामुळे महाराष्ट्राची अर्थव्यवस्था सुदृढ होईल, जीडीपी वाढेल. त्याचप्रमाणे पेट्रोकेमिकल उत्पादनांवरील आयात कर कमी होईल. त्यामुळे हा प्रकल्प बारसू येथे करावा. तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी हे पत्र कशासाठी लिहले, कोणाशी चर्चा केली हे मला माहिती नाही. आज उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असते तर बारसू रिफायनरी प्रकल्प यापूर्वीच पूर्ण झाला असता, असे ना. उदय सामंत यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना म्हटले.

ते पुढे म्हणाले की, बारसू रिफायनरीसाठी आज भू सर्वेक्षण सुरू झाले म्हणजे उद्या लगेच प्रकल्प सुरू होणार असे नाही. सध्या या ठिकाणी कंपनीकडून मृता परीक्षण केले जात आहे. बारसू आणि नाटे परिसरातील ६५ टक्के जनता या प्रकल्पाच्या बाजूने आहे, मात्र सरकार प्रकल्प विरोधकांशीही चर्चा करायला तयार आहे. आम्ही शेतकऱ्यांशी चर्चा करून त्यांचे गैरसमज दूर करू. सध्या आंदोलकांवर केवळ प्रतिबंधात्मक कारवाई झाली आहे.

बारसू रिफायनरी प्रकल्प हा कोकणाचा विकास करणारा प्रकल्प आहे. प्रकल्पाच्या विरोधात आहे. मुंबईतील काही लोक बारसूमध्ये जालियनवाला बाग हत्याकांड होईल, असे म्हणत आहेत. एकूणच हा प्रकल्प येणार नाही याची तजवीज करण्यात आली आहे. हे दुटप्पी राजकारण आहे. हे ठरवून केलेले राजकीय षडयंत्र आहे. स्थानिक जनतेने त्याला बळी पडू नये, असे सांगून यापूर्वी ठाकरे गटाने फॉक्सकॉनसारखे प्रकल्प राज्याबाहेर गेले तेव्हा पत्रकार परिषदा घेतल्या. मग आता राज्यात प्रकल्प येत आहे, तर त्याला विरोध का करीत आहात? ठाकरे गट आता आम्ही स्थानिकांसोबत असल्याचे सांगत आहे. मग उद्धव ठाकरे यांनी तेव्हा बारसू प्रकल्प सुरू करण्यासाठी पंतप्रधान मोदींना पत्र का पाठवले, असा सवाल मंत्री सामंत यांनी या वेळी उपस्थित केला.

उद्धव ठाकरे यांनी यापूर्वी समृद्धी महामार्गालाही विरोध केला होता. तेव्हा तत्कालीन मंत्री एकनाथ शिंदे यांनी भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून समृद्धी महामार्ग पूर्ण करण्याची भूमिका घेतली. पुढे हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर उद्धव ठाकरे यांच्याकडून समृद्धी महामार्गाचे उद्घाटन करून त्याचे श्रेय घेण्याचा प्रयत्न होता, पण तो सफल झाला नाही, असेही मंत्री उदय सामंत यांनी म्हटले.

## कामोठ्यात महाआरोग्य व रक्तदान शिबिरास प्रतिसाद

या शिबिरात जनरल तपासणी, नेत्र तपासणी व चष्मे वाटप, हाडांची तपासणी, स्त्रीरोग तपासणी, दंत तपासणी, रक्तदाब तपासणी, रक्त तपासणी, इसीजी अशा विविध तपासण्यात करण्यात आल्या. त्याचप्रमाणे अनेकांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करून या शिबिरास प्रतिसाद दिला.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्यासह अन्य मान्यवरांच्या हस्ते रक्तदात्यांचा प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, भाजपचे कामोठे शहर अध्यक्ष रविशेठ जोशी त्यांच्या ट्रस्टच्या माध्यमातून आरोग्याबाबतचे अनेक उपक्रम सातत्याने राबवून नागरिकांना दिलासा देण्याचे काम करीत आहेत. त्यांनी आज आयोजित केलेल्या रक्दान शिबिरामुळे अनेकांना जीवदान देण्याचे काम होत आहे. हे सगळ्यात पुण्याचे काम आहे. त्यांनी आपले कार्य असेच सातत्याने सुरू ठेवावे. पुढे बोलताना त्यांनी प्रत्येकाने आपापल्या परीने समाजाची सेवा करण्याचा प्रयत्न करीत योगदान देणे गरजेचे आहे, असे आवाहन केले, तर माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी, कोणत्याही प्रकारचा भेद न करता काम करणे हा रविशेठ जोशी यांचा स्वभाव असल्याचे सांगत आरोग्य शिबिर राबविल्याबद्दल त्यांचे कौतुक केले.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर व माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी रायगड मेडिकल असोसिएशनच्या अध्यक्षपदी पनवेल महापालिकेचे माजी आरोग्य सभापती तथा भाजप नेते डॉ. अरुणकुमार भगत यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

दरम्यान, या उपक्रमाचे औचित्य साधून भाजप महिला मोर्चा कामोठे शहर चिटणीसपदी सुरेखा लांडे आणि वनिता पाटील यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांना आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या.

# रायआवळ्यापासून सरबतासह आवळा सुपारीचा यशस्वी प्रयोग

**रेवदंडा : रामप्रहर वृत्त**

चिंच, आवळे, कैऱ्या, बोरे ही फळे अशी आहेत की, त्यांचे नाव काढले तरी आबालवृद्धांच्या तोंडाला पाणी सुटल्याशिवाय राहत नाही. यापैकीच राय आवळा हे फळ आहे. अलिबाग तालुक्यातील चौल-चंपावती आळीतील निसर्गमित्रांनी या राय आवळ्यापासून सरबत व आवळा सुपारी बनवण्याचा प्रयोग यशस्वी केला आहे.

राय आवळ्यामध्ये 'क' जीवनसत्त्व भरपूर असते, तसेच कॅल्शियम आणि इतर खनिजद्रव्य यात आढळतात. सुमारे आठ ते दहा फूट उंचीवर या झाडांना फळे लागतात. त्याच्या एका घडात सुमारे १०० फळे दिसतात. या आवळ्यांना बाजारपेठेत फारसे महत्त्व नसल्याने बागायतदारांकडून हे झाड दुर्लक्षित राहिले आहे. ऑक्टोबर, नोव्हेंबर, एप्रिल, मे आणि जुलै महिन्यात या झाडावर फळे लगडलेली असतात.



### असे बनते सरबत व सुपारी

*राय आवळा फळ उकडून त्याचा गर पिळल्यानंतर मिळणाऱ्या रसात चवीनुसार साखर, मीठ व पाणी मिसळून चवदार सरबत तयार होते, तसेच गर काढल्यावर राहिलेल्या चोथ्यात सैंधव मीठ व जिरेपूड टाकून सौर वाळवणी यंत्रात उत्तम आवळासुपारी बनवली जाते.*

## निवडक

### करंजाडे येथे इमारतीला आग

**पनवेल :** करंजाडे येथील एका इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर आग लागल्याची घटना घडली. अग्निशामक



दलाच्या जवानांनी या आगीवर नियंत्रण मिळवले. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. शिव कमल बिल्डिंग रुम – ३०४, प्लॉट नं १६५, करंजाडे येथे एसीमध्ये शॉर्ट सर्किट झाल्याने आग लागली. या आगीत घरातील थोड्या फार प्रमाणात नुकसान झाले आहे. याची माहिती अग्निशामक दलाला देण्यात आली. आगीची माहिती पनवेल शहर पोलीस ठाण्याचे अधिकारी व कुणाल लोंढे करंजाडे पोलीस पाटील यांना मिळताच ते घटनास्थळी दाखल झाले. अग्निशामक दलाच्या जवानांनी आग आटोक्यात आणली आहे, यात कोणतीही जिवीत हानी झाली नाही.

### कोन येथून विवाहिता बेपत्ता

**पनवेल :** तालुक्यातील कोन गाव येथून एक विवाहित महिला कोणास काही न सांगता आपल्या राहत्या



घरातून कोठेतरी निघून गेल्याने ती हरवल्याची तक्रार तालुका पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. मिनारा बेबी अब्दुल रशिद खान असे या महिलेचे नाव असून तिचे वय २६ वर्षे, रंग सावळा, उंची पाच फूट असून अंगात पिवळा टॉप व काळी लेगिन्स घातलेली आहे. तिला मराठी, हिंदी, बंगाली, भोजपुरी भाषा बोलता येत असून नाकात सोन्याची चमकी, पायात पैजन व काळी सॅन्डल घातलेली आहे. तसेच तिच्या डाव्या बाजूच्या कानाची पाळी कापल्याची जूनी खुन आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्या तालुका पोलीस ठाणे किंवा पोलीस हवालदार अमर भालसिंग यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### पनवेलमध्ये श्रीमद्भगवद्गीता वर्ग

**पनवेल :** श्री गुरुकुलम् न्यासाच्या वतीने विनामूल्य श्रीमद्भगवद्गीता संथा वर्गाचे आयोजन शनिवार (दि. २९) पासून करण्यात आले आहे. हे वर्ग सर्व वयोगटाच्या महिला, पुरुष व मुलांना खुला आहे. पनवेल रेल्वे स्टेशन रोडवरील नारायण बाबा आश्रमाच्या श्री. साईबाबा मंदिरात शनिवार आणि रविवार दुपारी ४ ते ६ हे वर्ग असणार आहे. या वर्गामध्ये सहभागी होण्यासाठी मराठी वाचता येणे पुरेस आहे. तसेच वर्गात श्रीमद्भगवद्गीतेतील प्रत्येक श्लोक स्पष्ट, शुध्द व लयबध्द वाचायला शिकवला जाणार आहे. यामध्ये आजच्या काळाशी सुसंगत अर्थही सांगितला जाणार आहे. या वर्गात सहभागी होण्यासाठी अध्यक्षा मंजिरीताई फडके (८००७९७६३४३), कार्यवाह (८९२८७४८८५५) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# प्रकल्पबाधितांच्या सुविधांमध्ये भर

## भूखंडांची अद्ययावत माहिती सिडकोच्या संकेतस्थळावर उपलब्ध

**पनवेल : सिडको वृत्तसेवा**

सिडको उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी यांच्या मार्गदर्शनाखाली डिजिटायजेशनच्या दिशेने नवे पाऊल टाकत, सिडकोने आपला महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पातील प्रकल्पबाधितांना २२.५ टक्के योजनेंतर्गत वाटपित करण्यात आलेल्या भूखंडांची सविस्तर माहिती आपल्या https://cidco.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली आहे.




सिडकोतर्फे पनवेल तालुक्यामध्ये ११६० हेक्टरवर नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प साकारण्यात येत आहे. या प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या १० गावांतील प्रकल्पबाधितांना महाराष्ट्र शासनाने मंजुर केलेले देशातील सर्वोत्तम असे पुनर्वसन आणि पुन:स्थापन पॅकेज सिडकोतर्फे देण्यात आले आहे. या पॅकेज अंतर्गत विमानतळ प्रकल्पबाधितांना पुष्पक नगर या पुनर्वसन आणि पुन:स्थापन क्षेत्रात २२.५% योजनेंतर्गत विकसित भूखंडांचे वाटप करण्यात येत आहे.

सिडकोतर्फे, २२.५ टक्के योजनेतील बांधकामधारकांची पात्रता यादी, वाटपित भूखंडांचा संचिका, गाव व बांधकामधारक निहाय तपशील, वाटपपत्र व करारनाम करण्यात आल्याचा दिनांक इ. सविस्तर माहिती https://cidco.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामुळे विमानतळबाधितांना घरबसल्या पात्रता यादी व भूखंड वाटपाची सद्यस्थिती जाणून घेता येणार आहे. तसेच भूखंड वाटपाची प्रक्रियाही अधिक पारदर्शक व सुलभ होण्यास यामुळे मदत झाली आहे.

> **नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळबाधितांच्या सोयीसाठी सिडकोने ही माहिती ऑनलाईन उपलब्ध करून दिली आहे. सिडकोच्या ई-प्रशासन उपक्रमातील हे आणखी एक महत्त्वाचे पाऊल आहे. यामुळे या महत्त्वाकांक्षी प्रकल्पातील भूखंड वाटप प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि सुलभ झाली आहे. प्रकल्पबाधितांच्या प्रति सिडको पारदर्शकता आणि निष्पक्षता या उद्देशासाठी वचनबद्ध आहे.**
>
> **–डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

## लग्नाचे प्रलोभन दाखवून शिक्षिकेला फसविणारा अटकेत

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमधील एका शिक्षिकेसोबत सोशल मीडियावरून मैत्री केल्यानंतर तिला लग्नाचे प्रलोभन दाखवून तरुणाने अत्याचार व फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी आरोपीला पनवेल शहर पोलिसांनी सापळा रचून अटक केली आहे.



कृष्णा मेंगळ (वय ३२, रा. अहमदनगर) असे या आरोपीचे नाव असून त्याने वर्षभरापूर्वी पीडित शिक्षिकेशी सोशल मीडियावरून मैत्री करून तिच्यासोबत प्रेमसंबंध निर्माण केले. तिला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर अनेक वेळा लैंगिक अत्याचार केले. याचदरम्यान, त्याने वेगवेगळ्या बहाण्याने तिच्याकडून तब्बल ११ लाख ८० हजारांची रक्कम उकळली. नंतर लग्न करण्यास टाळाटाळ सुरू केली. त्यामुळे तिने आपली रक्कम परत मागण्यास सुरुवात केली. त्यामुळे त्याने आपल्या मूळ गावी पलायन केले. त्यानंतर त्याने शिक्षिकेच्या मोबाइलवर वारंवार संपर्क साधून शिवीगाळ केली तसेच तिला जिवे मारण्याची धमकीही दिली. अखेर शिक्षिकेने पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी त्याच्याविरोधात बलात्कारासह, फसवणुकीचा गुन्हा दाखल केला.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांनी त्यांच्या पथकाला मार्गदर्शन करून सूचना दिल्या. त्यानुसार हे पथक तांत्रिक तपास आणि गुप्त बातमीदाराच्या सहाय्याने आरोपीचा शोध घेताना आरोपी हा काही कामानिमित्त करंजाडे येथील एका मेडिकल स्टोर परिसरात येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांच्या पथकाने सापळा रचून त्याला ताब्यात घेऊन अटक केली. आरोपीने अजून काही गुन्हे केले आहे का, याचा तपास शहर पोलीस करीत आहेत.

## अपघातामध्ये पत्नीचा मृत्यू; पती गंभीर जखमी

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा औद्योगिक वसाहतीमधील आरए एफ सिग्नल जवळ येथे एका भरधाव ट्रकने ओव्हटेक करणाच्या नादात मोटरसायकलीस ठोकर दिली. या ठोकरमध्ये मोटरसायकलवर बसलेले पती-पत्नी पैकी पत्नी गंभीर जखमी होऊन मयत झाली आहे तर पती गंभीर जखमी झाला आहे.

ठाणे जिल्ह्यातील वालकन येथील प्रवीण पांडुरंग पाटील (वय २६) हा त्याची पत्नी रविना प्रवीण पाटील (वय २६) हिला घेऊन तिला तळोजा गाव येथे दवाउपचार कामी घेवुन जात असतांना आरएएफ सिग्नल ओलांडत असतांना पाठीमागुन येणारा ट्रक (एमएच ०४ डीडी २५३३) वरील अज्ञात चालकाने भरधाव चालवुन ओव्हटेक करीत असताना अचानक डाव्या बाजुस वळवून मोटरसायकलीस ठोकर मारली.

यामध्ये पत्नी रविना ही गंभीर जखमी होऊन मयत पावली तर पती प्रविण पाटील ह्याचा उजवा हात फॅक्चर झाला. याप्रकरणी अज्ञात ट्रकचालकाविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## वांगणी तर्फे वाजेच्या उपसरपंचपदी लीला कातकरी





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वांगणीतर्फे वाजे ग्रामपंचायतीच्या उसरपंचपदी भाजपच्या लीला नामदेव कातकरी यांची बिनविरोध विजयी झाल्या आहेत. पनवेल तालुक्यातील वांगणी तर्फे वाजे ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदाची निवडणूक मंगळवारी (दि. २५) झाली.

या निडवणूकीत भाजपच्या लीला नामदेव कातकरी या बिनविरोध विजयी झाल्या आहेत. त्याबद्दल त्यांचे भारतीय जनता पक्षाचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले व पुढील वाटचालीकरीता शुभेच्छा दिल्या.

या वेळी भाजपचे पनवेल तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरपंच सुरेखा पवार, सदस्य संतोष शेळके, अक्षता म्हात्रे, संपदा पालव, सुवर्णा पाटील, माजी जि. प. सदस्य अमित जाधव, माजी पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, विचुंबे विभागीय पंचायत समिती अध्यक्ष सतीश मालुसरे, सुकापूर अध्यक्ष राजेश पाटील, माजी सरपंच अनंता पाटील, गुरुनाथ भोईर, प्रमोद घरत, प्रवीण पालव, अशोक पवार, अतिश मालुसरे, गणेश पाटील, प्रवीण म्हात्रे, संतोष पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.



(छाया : अक्षय शार्दुल)

**पनवेल : आदई येथील प्राचीन स्वयंभू शिव मंदिराचा प्रथम वर्धापन दिन मंगळवारी होता. या वर्धापन दिनानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांना भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट देत दर्शन घेतले. या वेळी जगदीश शेळके, महादू शेळके, राजेश काकडे, निलेश पाटील, ज्ञानेश्वर पाटील, श्रीचंद भंडारी, बाळाशेठ पाटील, राहुल पाटील आदी उपस्थित होते.**

## महिलांना स्वसंरक्षणाचे मोफत प्रशिक्षण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड तायक्वान्डो असोसिएशन अंतर्गत अनन्या एजन्सी व विनायकी महिला बचत गट आयोजित स्वसंरक्षणाचे मोफत प्रशिक्षण आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले. या प्रशिक्षणाचे उद्घाटन पनवेलच्या माजी उपमहापौर व भाजप उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष चारुशीला घरत यांच्या हस्ते करण्यात आले.



या वेळी माजी नगरसेविका राजश्री वावेकर, भाजप महिला मोर्चा सरचिटणीस व विजेएनटी उपाध्यक्ष प्रदेश कार्यकारिणी सदस्य सुहासिनी केकाणे यांनी कार्यक्रमास हजेरी लावली व मार्गदर्शन केले. रायगड तायक्वान्डो असोसिएशनचे सुभाष पाटील आणि त्यांच्या संपूर्ण टीमने स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण महिलांना दिले.

या कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक प्रकोष्ठ कोकण विभाग सहसंयोजिका अक्षया चितळे व महिला मोर्चा शहर सरचिटणीस अंजली इनामदार यांनी नवीन पनवेल सेक्टर ११ येथे केले होते. त्यास प्रतिसाद लाभला.

## विचुंबे येथील साडीच्या दुकानातून पर्सची चोरी

### दोन महिलांविरोधात गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

साडीच्या दुकानात एक लाख रुपये रोख रक्कम असलेली पर्स दोन महिलांनी लंपास केल्याची घटना तालुक्यातील विचुंबे येथे घडली आहे. याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात अज्ञात महिलांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विचुंबे गाव दिलीप निवास, आरती डेरीच्या बाजूला ओम साई कलेक्शन नावाने रोशनी प्रवीण रामाणे यांचे साडीचे दुकान आहे. या दुकानाच्या समोर मारुती वॅगन आर गाडी उभी राहिली त्यातून दोन महिला व त्यांच्यासोबत तीन लहान मुले दुकानामध्ये आले. साडी खरेदी करण्याच्या बहाण्याने ही लोक दुकानामध्ये आली व दुकानामध्ये असलेली पर्स घेऊन कारमध्ये बसून निघून गेली. या पर्समध्ये रामाणे यांचे रोख रक्कम एक लाख रुपये, एटीएम कार्ड, आधार कार्ड, पॅन कार्ड आदी वस्तू होत्या याबाबत रोशनी रामाणे यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल केला आहे.

खांदेश्वर पोलिसांनी अज्ञात व्यक्तींविरोधात कलम ३८०/३४ नुसार गुन्हा दाखल केला आहे व अधिक तपास खांदेश्वर पोलीस करीत आहेत. दरम्यान, ठिकठिकाणी पोलीस चेकिंग असतानाही दिवसेंदिवस चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नागरिक भयभीत झाले आहेत.

## तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात 'सीकेटी'चा मयंक राजगुरू प्रथम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंचायत समिती शिक्षण विभाग पनवेल आयोजित तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन स्पर्धेत नववी ते बारावी या गटात जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयातील मयंक प्रदीप राजगुरू (बारावी सायन्स) याने सादर केलेल्या ॲक्सिडेंटल अर्लाम सिस्टिम (Accidental alarm system) या विज्ञान प्रकल्पास तालुका स्तरावर प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

मयंक याने संपादित केलेल्या यशाबद्दल त्याचे जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस. टी. गडदे, सहसचिव भाऊसाहेब थोरात, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## उन्नती साळवी ठरली 'मेस्मेरिक क्वीन'

**पनवेल : वार्ताहर**

गुरमीत गार्हा ग्रूमिंग स्कूल प्रस्तुत 'मेस्मेरिक मिस इंडिया २०२३' स्पर्धेत खारघर येथे राहणाऱ्या उन्नती विलास साळवी हिने 'मेस्मेरिक क्वीन मिस इंडिया २०२३' हा किताब मिळविला. या स्पर्धसाठी प्रमुख पाहुणे म्हणून बॉलिवूड मधील प्रसिद्ध अभिनेत्री ईशा कोपिकर, डान्स कोरिओग्राफर सिंधू नायर उपस्थित होते.



नेरूळ येथील एनसीआरडी स्टर्लिंग बँक्वेट हॉल येथे झालेल्या अंतिम फेरीत उन्नती विलास साळवी हिने यास्मिन शेख व लगन थल यांच्यावर मात करत 'मेस्मेरिक क्वीन मिस इंडिया २०२३' चा किताब मिळविला. या स्पर्धेत यास्मिन शेख प्रथम उपविजेती तर लगन थल दुसरी उपविजेती ठरली. वीस वर्षीय उन्नती हि खारघरची रहिवाशी असून तिचे वडील हे पोलीस खात्यात कार्यरत आहेत. ती नवी मुंबई येथील येरळा मेडिकल कॉलेजमधील बीएएमएसमध्ये तृतीय वर्षात शिकत आहे. उन्नतीला आयुष्यात सर्जन होण्याची इच्छा आहे. उन्नती साळवी हिने यापूर्वी 'एविए एन्टरटेनमेंट' तर्फे दुबईत आयोजित करण्यात आलेल्या फॅशन शोमध्ये प्रथम क्रमांक मिळवले होते. तसेच पनवेल येथील 'आयएनआयएफडि' यांच्या वार्षिक, उच्च श्रेणीच्या फॅशन शो 'सोल सेन्सेशण ३.०' मध्ये शो स्टॉपर म्हणून वॉक केलेला आहे.

नवी मुंबईतील 'मिस मेस्मेरिक क्वीन इंडिया २०२१' यामध्ये 'मिस स्पेक्टाक्यूलर आईज' हे उपशीर्षक प्राप्त केले. त्याचप्रमाणे पुणे येथील पार पडलेल्या 'मिस स्यायलिंग स्टार इंडिया २०२२' या प्रतियोगितेत प्रथम क्रमांक पटकावत 'मिस परफेक्ट बॉडी' हे उपशीर्षकही प्राप्त केले. अलीकडेच कुमार सानू यांनी गायलेल्या व शेमरूच्या चॅनेलवरील तेरी यादे या मुझिक अल्बममध्ये ती मॉडेल म्हणून प्रसिद्धीस आली होती.

## उरणमध्ये रक्तदान शिबिर; १७१ दात्यांचा सहभाग

**उरण : बातमीदार**

श्री अनिरूद्ध आदेश पथक, दिलासा मेडिकल ट्रस्ट ॲण्ड रिहॅबिलिटेशन सेंटर, अनिरूद्धाज अकॅडमी ऑफ डिझास्टर मॅनेजमेंट, अनिरूद्ध समर्पण पथक या संस्थांनी एकत्र येत रविवारी (दि. २३) महारक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. एकूण १७१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. त्यापैकी १३९ स्वीकारण्यात आले.

उरण तालुक्यात उरण नगर परिषद शाळा क्रमांक १, पेन्शनर्स पार्क उरण शहर येथे रक्तदान शिबिर मोठ्या उत्साहात, उत्तम प्रतिसादात झाले.

या वेळी या रक्तदान शिबिरात उरण, मुळेखंड, कोप्रोली, आवरे, सोनारी या उपासना केंद्राने सहभाग घेतला. डॉ. अनिरूद्ध जोशी, एम. डी. मेडिसिन (सद्गुरू श्री अनिरुद्ध बापू) यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन झालेल्या या संस्था १९९९ सालापासून रक्तदान शिबिरांचे आयोजन करून आत्तापर्यंत १.६५ लाख युनिट इतके रक्त संकलित केले आहे.



## महाराष्ट्रीयन बिल्डर्स असोसिएशनतर्फे आर्थिक विषयावर मार्गदर्शन शिबिर

**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्रीयन बिल्डर्स असोसिएशनतर्फे वेध पैशाचा या आर्थिक विषयावर नवी मुंबई मधील कोर्टयार्ड मेरिओट, नेरूळ येथे मार्गदर्शन शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात विविध फायनान्स कंपनीच्या तज्ज्ञांनी मोठ्या प्रमाणात मार्गदर्शन केले. 'वेध पैशाचा' या मार्गदर्शन शिबिरामध्ये विविध फायनान्स कंपन्या, बँका, वित्तीय संस्था यांचे कर्ज वाटपाचे धोरण, त्यांचे नियमावली आधी विषयावर तज्ज्ञांच्या माध्यमातून या वेळी मार्गदर्शन करण्यात आले.



या वेळी हिरो फिनकॉपचे जितेंद्र सिंग, पिरॅमिलचे नॅशनल बिजनेस हेड अर्पित बढ़ानी, बजाज हाऊसिंग फायनान्सचे लोकेश डोडानी, आयसीआयसीआयचे नितेश शहा, प्रकाश द्वारा आदी उपस्थित होते. या शिबिरातील मान्यवरांचे मार्गदर्शन हे खूप मोलाचे असून भविष्यात बांधकाम व्यवसायिकांना त्यांचा योग्य फायदा होईल, असा विश्वास महाराष्ट्रीयन बिल्डर्स असोसिएशनचे अध्यक्ष आनंद पाटील यांनी व्यक्त केला.

याचप्रमाणे या शिबिरातील मार्गदर्शन विविध क्षेत्रातील लोकांनासुद्धा फायदेशीर होऊ शकते, असे मत महाराष्ट्रीयन बिल्डर्स असोशियनचे महासचिव हितेश सावंत यांनी व्यक्त केले.

या वेळी खजिनदार महेश माटे, उपाध्यक्ष संग्राम पाटील, किरण बागड, लक्ष्मण साळुंके, माजी अध्यक्ष संतोष आंबवणे, कमिटी सदस्य विकास भामरे, शंकर म्हात्रे, बाबासाहेब भोसले, अजय पाटिल, सुनील ठोंबरे, सदस्य संतोष उगले, कार्यक्रमाचे संयोजक बाळासाहेब देशमुख व अनेक बांधकाम व्यावसायिक उपस्थित होते.

## संपादकीय

# दुतोंडीपणाचा कळस

कोकणातील नाणार येथे उभ्या राहू पाहणाऱ्या रिफायनरी प्रकल्पाला शिवसेनेचा पहिल्यापासूनच विरोध होता. नाणार येथील प्रकल्प हाणून पाडल्यानंतर कोकणातील बारसू येथील जागा ठाकरे सरकारनेच केंद्र सरकारला सुचवली होती. आता पुन्हा एकदा विरोधी बाकांवर बसणे नशिबी आल्यानंतर नियोजित बारसू प्रकल्पाला देखील विरोध करण्याचे पाप ठाकरे गट करू लागला आहे. याला दुतोंडीपणाचा कळस म्हणायचे नाही तर काय?

**सत्ताधारी पक्षाला विरोध करून सरकारी यंत्रणेवर वचक ठेवण्याचे काम विरोधी पक्षांना करायचे असते. किंबहुना ते त्यांचे कर्तव्यच आहे. परंतु याच विरोधाला द्वेषाचा रंग चढला की विरोधाचे हेतूच बदलतात. ठाकरे गटाचे नेमके हेच झाले आहे. सुमारे तीन-साडेतीन वर्षांपूर्वी जनमताला न जुमानता उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील अखंड शिवसेनेने काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसशी साटेलोटे करून सत्ता काबीज केली. लोकशाहीची सारी तत्त्वे आणि मूल्ये पायदळी तुडवून त्यांना मुख्यमंत्रीपदाची खुर्ची बळकावता आली हे खरे, पण यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक अर्थांनी पडझड झाली. ठाकरे यांचा हा निर्णय आत्मघातकी ठरला आणि त्याची परिणती शिवसेना फुटण्यात झाली. महाविकास आघाडीचे सरकार देखील पायउतार झाले. कोकणातील नाणारचा प्रकल्प रद्द करून बारसू येथील जागा सुचवण्याचे काम ठाकरे सरकारनेच पार पाडले होते. तसे अधिकृत पत्र तेव्हा मुख्यमंत्रीपदावर असलेल्या उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाठवले होते. त्याच बारसू येथील जमिनीचे सर्वेक्षण सुरु झाल्यानंतर मात्र ठाकरे गटाच्या नेत्यांनी विरोधाचा पवित्रा घेतला आहे. बारसू येथील काही स्थानिकांचा नियोजित रिफायनरी प्रकल्पाला विरोध आहे. त्यांची समजूत काढण्याचे काम सरकार पातळीवर जोरात सुरू आहे. सदरील प्रकल्पामुळे कोकणातील पर्यावरणाचे अपरिमित नुकसान होईल अशी भीती काही तथाकथित पर्यावरणवाद्यांनी ग्रामस्थांच्या मनात पेरली आहे. वास्तविक बारसू येथील ज्या माळरानावर हा प्रकल्प उभा राहणार आहे, तेथे एकही मोठे झाड नाही. प्राचीन कातळशिल्पांचा भाग तेथे आहे हे खरे, परंतु तेवढा भाग आवर्जून जतन केला जाईल असे आश्वासन देण्यात आले आहे. हा प्रकल्प उभा राहिला तर किमान एक लाख स्थानिकांना थेट रोजगार उपलब्ध होणार आहे, तसेच सुमारे दहा लाख रोजगार व्यवसायाच्या प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संधी उपलब्ध होतील. हा हरित प्रकल्प असल्यामुळे पर्यावरणाच्या नुकसानाचा प्रश्नच उद्भवत नाही. एकंदरित कोकणचा कायापालट करणारा हा प्रकल्प फक्त कोकण प्रांतालाच नव्हे तर महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला सुदृढ करणारा ठरेल. असे असताना देखील ठाकरे गटाचे काही नेते स्थानिक ग्रामस्थांची माथी भडकवण्याचे काम करीत आहेत. ही अत्यंत दुर्दैवाची बाब आहे. विरोधाच्या पवित्र्यात उभ्या राहिलेल्या स्थानिकांशी चर्चा करून त्यांची मने वळवण्यासाठी प्रयत्न केले जातील असे आश्वासन देताना बारसू येथे रिफायनरी प्रकल्प होणारच असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठणकावून सांगितले हे बरे झाले. प्रकल्प हाणून पाडणाऱ्या सुपारीबाजांची गय केली जाणार नाही असाही इशारा त्यांनी दिला हे देखील योग्यच झाले. आरेतील मेट्रो प्रकल्प, समृद्धी महामार्ग, नाणार प्रकल्प अशा विकासकामांना सतत विरोध करणाऱ्या ठाकरे गटाने आत्मपरिक्षण करावे. अन्यथा विकासाचे शत्रू म्हणून त्यांची ओळख निर्माण होईल.**

# पनवेल रेल्वे स्टेशन सुविधांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष




**खबरबात**
**नितीन देशमुख**

मुंबईचे प्रवेशद्वार समजल्या जाणाऱ्या पनवेलचे रेल्वे स्थानक महत्वपूर्ण मानले जाते. या स्टेशनवरील नवीन पनवेलकडे जाण्यासाठी असलेला फूट ब्रिज धोकादायक झालेला आहे. फूट ब्रिजचे लोखंडी पोल सडले आहेत. मालगाडी खालून गेल्यावर त्याला हादरे बसतात, पण रेल्वे प्रशासन त्याकडे अक्षम्य दुर्लक्ष करीत आहे. सन २०१९नंतर या पुलाचे स्ट्रक्चरल ऑडिट झालेले नाही. या एकमेव नवीन पनवेलकडे जाणाऱ्या पुलावर मोठ्या प्रमाणात गर्दी होते. यामुळे एल्फिस्टन स्टेशन किवा सीएसटी येथील पूलासारखी दुर्घटना घडू शकते. येथे दुर्घटना घडल्यास नवीन पनवेलमध्ये जाण्यास कोणतीही पर्यायी व्यवस्था या स्टेशनमध्ये नाही यासाठी रेल्वे प्रशासनाने त्याबाबत दक्षता घेणे गरजेचे असताना तिकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे. याबाबत प्रवासी संघटनेचे पदाधिकारी मूग गिळून बसलेले दिसत आहेत.

मध्य रेल्वेचे पनवेल रेल्वे स्टेशन हे मोठे जंक्शन आहे. येथे क्रमांक १ ते ४ फलाटावर लोकल गाड्या तर क्रमांक ५ ते ७ वर लांब पल्ल्याच्या गाड्या येत असतात. फलाट क्रमांक ५ ते ७ हे नवीन पनवेल बाजूला आहेत. पनवेल शहराचा मोठ्या प्रमाणात विकास हा नवीन पनवेल बाजूला झाला आहे. या बाजूला मोठ्या प्रमाणात रहिवासी वसाहती व इंजिनियरिंग व इतर महाविद्यालये असल्याने प्रवाशांची विद्यार्थ्यांची जा-ये असते. याबाजूला जाण्यासाठी ६ फूट रुंदीचा पूल आहे. लोकल थांबल्यावर अनेक जण या पुलावर जाण्यासाठी फलाटावरून धावत जात असतात. फलाट क्रमांक ६ किवा ७ वर एक्स्प्रेस किवा ईमू गाडी फलाटावर आल्यास गर्दीमुळे पुलावर चढणे म्हणजे दिव्यच असते पुलावर प्रवाशांची कोंडी होते.

पनवेल रेल्वे स्टेशनमधून नवीन पनवेलमध्ये जाण्यासाठी ८०च्या दशकात लोखंडी फूट ब्रिज बांधण्यात आलेला आहे. लांब पल्ल्याच्या गाडीत बसण्यासाठी ही याच पूलाचा वापर करावा लागतो. या पूलावरून रोज लाखो रेल्वे प्रवाजी जात असतात. या पुलाचा नवीन पनवेल बाजूकडून दूसरा आणि तिसरा लोखंडी खांब वरच्या बाजूला पूर्ण सडलेला आहे. तुळई आणि स्तंभाच्या जोडणीच्या ठिकाणी स्तंभामध्ये गंज सुरू झाला आहे. स्तंभ विभागाच्या क्रॉस सेक्शनल क्षेत्रामध्ये घट झाली आहे. गंज वेब आणि लांबीच्या बाजूने फिरत आहे. फ्लँजपैकी एक वेबपासून जवळजवळ विभक्त आहे. जेव्हा एक्स्प्रेस आणि लोकल गाड्या एकाच वेळी येतात तेव्हा पादचारी मोठ्या प्रमाणात येत असल्याने मोठे वजन पूलावर येते. अशावेळी पूलाच्या ताकदीचे हे कमी झालेले गुणधर्म कोणत्याही चेतावणी सिग्नलशिवाय अचानक अपयशी ठरू शकतात. त्वरित दुरुस्तीने हे टाळले जाऊ शकते अशी माहिती एका प्रत्यदर्शी अभियंत्याने दिली आहे. या पुलाच्या खाली नवीन रेल्वे मार्गाचे काम सुरू असल्याने जेसीबी लावून तेथे खड्डे खणतानाही हादऱ्याने त्याच्या स्ट्रक्चरला धक्के बसले आहेत. पूलाखालून मालगाडी गेल्यावर हादऱ्याने पूल हालतो याचा अनुभव अनेकांनी घेतला आहे. त्यामुळे गर्दीच्या वेळी वजन सहन न झाल्याने हा पूल केव्हाही मोडून पडून चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारशहा येथील दुर्घटने सारखी दुर्घटना घडू शकते.

रेल्वेच्या विभागीय सल्लागार समितीचे सदस्य व प्रवासी संघटनेचे सचिव श्रीकांत बापट यांना सडलेले खांब प्रत्यक्ष नेऊन दाखवले. त्यावेळी त्यांनी नेहमीप्रमाणे पेपरातील बातमी दाखवून 'अरे, मला दहा बायांचे फोन आले' असे सांगीतले. पण रेल्वे अधिकाऱ्यांना खुश करून आपल्याला विभागीय समितीचे सदस्यपद मिळवण्यात धन्यता मानणाऱ्यांनी त्याबाबत कोणतीही हालचाल केली नाही. उलट स्टेशनवरील फलाट क्रमांक ५ वरील लिफ्टचा दरवाजा चुकीच्या बाजूला केल्याने प्रवाशांना अडचण होत असताना लिफ्ट सुरू झाल्याची बातमी छापू नका पण त्याबाबत वरिष्ठ अधिकारी नाराज होतील म्हणून निषेध करू नका, असे सांगितले.

पनवेल जंक्शनचे काम सुरू असल्याने त्यामध्ये नवीन पनवेलमध्ये जाण्यासाठी भुयारी मार्ग बांधण्यात येणार आहे. त्याचे काम सुरु होते, पण खडक लागल्याने हे काम दोन वर्षापूर्वी थांबवण्यात आले. सुरुंग न लावता खडक फोडण्याचे नवीन तंत्रज्ञान वापरण्यात येणार असल्याचे सांगितले जाते पण त्याला अद्याप मुहूर्त सापडलेला नाही. त्यामुळे हा पूल कोसळल्यास नवीन पनवेलला येण्यासाठी दूसरा मार्ग उपलब्ध नाही. याबाबत ही प्रवासी संघटना गप्प आहे एसटी आगाराबाबत यांनी सहा महिन्यापूर्वी आंदोलनाचा फार्स केला. आगाराचे काम सुरू होणे दूरच आगारातील खड्डेही पूर्ण न भरताच याची बोळवण करण्यात आली. त्यामुळे आता यांच्यावर विश्वास न ठेवता प्रवाशांनी स्वत:च रेल्वे पुलाबाबत आवाज उठवणे गरजेचे आहे.

## कृषी योजनांना प्राधान्य

राज्य सरकारने गरीब व गरजू शेतकऱ्यांना अनेक योजना राबविण्यास सुरुवात केली आहे. या योजनेअंतर्गत सरकारने कृषी यांत्रिकरणाला प्राधान्य दिले आहे. राज्य सरकार अनुसूचित जाती जमातीच्या शेतकऱ्यांना ५०% तर इतर शेतकऱ्यांना ४०% कृषी यांत्रिकीकरणाला अनुदान देणार आहे.

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना अनुदान : अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना ५५% अनुदान तुषार सिंचन किंवा ठिबक सिंचनावर मिळणार आहे. तर इतर राहिलेल्या शेतकऱ्यांना ४५% अनुदान मिळणार आहे. पाण्याचा शेतीसाठी पुरेपूर वापर शेतकऱ्यांना करून देण्यासाठी महाराष्ट्र राज्य सरकारने जलसिंचनाची सूक्ष्म सिंचन योजना राबवली आहे. जेणेकरून कमी पाण्यात सुद्धा शेतकऱ्याला भरघोस उत्पादन घेता यावे यासाठीच राज्य सरकारने ठिबक सिंचन आणि तुषार सिंचन योजना राबवली आहे.

तुषार सिंचन योजना : तुषार सिंचन प्रणालीद्वारे पंप, स्पिंकलर्स, वॉल्व्ह आणि पाईप्स द्वारे पाणी दिले जाऊन कमी पाण्यात चवली शेती करण्याची जलसिंचन प्रणाली आहे. या सिंचन प्रणालीचा वापर औद्योगिक आणि शेतीसाठी केला जाऊ शकतो. जेव्हा पंपच्या मदतीने मुख्य पाईपद्वारे दाबून पाणी वाहू दिले जाते तेव्हा फिरणाऱ्या नोझलमधून बाहेर पडते आणि ते पिकावर लहान पावसासारखे शिंपडले जाते. सिंचन प्रणालीद्वारेही पाणी कमी वापरले जाते आणि ते थेट पिकाच्या मुळाशी जाते.




# ट्वीटरने पैसे न घेताच 'या' लोकांना परत दिली ब्लू टिक



मायक्रो ब्लॉगिंग वेबसाईट असा लौकिक असणाऱ्या ट्विटरने काही दिवसांपूर्वीच सगळ्या अकाऊंट्सच्या ब्लू टिक काढून टाकल्या होत्या. ट्वीटरवर ब्लू टीक मिळणं म्हणजे अकाऊंट व्हेरिफाईड असल्याची खूण. मात्र ही खूण गेल्यामुळे अनेकजण त्रासले होते. खुद्द अमिताभ बच्चन यांनीही याबाबत आपलं म्हणणं व्यक्त केलं होतं. शाहरुख खान, सलमान खान, काँग्रेस नेते राहुल गांधी या आणि अशा अनेक अकाऊंटवरून ब्लू टिक गेली होती. पण आता अनेकांनी पैसे न देताच ही ब्लू टिक परत आली आहे.

आपला लाडका सचिन तेंडुलकर याच्या अकाऊंटची ब्लू टिक हटवण्यात आली होती, ही ब्लू टिक परत आली आहे. तसंच विराट कोहली आणि इतर काही महत्त्वाच्या दिग्गजांचेही ब्लू टिक परत आले आहेत. जम्मू काश्मीरचे माजी मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांच्या ट्वीटरवरही ब्लू टिक दिसू लागली आहे. नोबेल पुरस्कार विजेती मलाला युसूफजाईच्या अकाऊंटवरही ब्लू टिक आली आहे. त्याबद्दल तिने आनंद व्यक्त केला आहे. ट्विटरवर अशा अनेक सेलिब्रिटींच्या अकाऊंटवर ब्लू टिक परत आली आहे.

मायक्रोब्लॉगिंग साइट ट्विटरने प्रतिष्ठित लोकांच्या खात्यावरील ब्लू टिक हटवण्यास सुरुवात केली होती. यामध्ये अभिनेता, अभिनेत्री, खेळाडू, पत्रकार, राजकारणी यांचाही समावेश आहे. यामध्ये भारत सरकारच्या काही शासकीय विभागांच्या खात्यांचाही समावेश आहे. ट्विटर ब्लूसाठी पैसे न भरल्यामुळे या खात्यांसमोरील ब्लू टिक हटवण्यात आली आहे. असे असले तरी अगोदरपासून काही ट्विटर खात्यांना गोल्डन, ग्रे (राखाडी) रंगाचे व्हेरिफेकशन बॅच देण्यात आले आहेत.

ट्विटरने ब्लू टिक काढून टाकण्याच्या निर्णयानंतर जगातील अनेक प्रसिद्ध लोकांची ट्विटर खाती सर्वसामान्य लोकांसारखीच झाली आहेत. डीडब्ल्यूने दिलेल्या वृत्तानुसार एलॉन मस्क यांनी हा निर्णय घेण्याअगोदर जगभरात साधारण तीन लाख लोकांच्या खात्यावर ब्लू टिक होते.

# सौंदर्याने मने जिंकणारी मौसमी चॅटर्जी



**विशेष**

साध्यासुंदर सौंदर्याने लोकांची मने जिंकणारी अभिनेत्री मौसमी चॅटर्जी यांचा जन्म कलकत्ता येथे झाला. त्याचे वडील सैन्यात होते. याशिवाय तिच्या आजोबांनी न्यायाधीश म्हणून काम केले होते. तिला भाऊ आणि एक बहीण आहे. त्या महान गायक हेमंत कुमार यांची कन्या होय. त्यांना पायल आणि मेघा नावाच्या दोन मुली आहेत. अभिनेत्री मौसमी चॅटर्जी हिने बॉलीवूडची विचारधारा कायमचीच बदलून टाकली, ज्यामध्ये 'लग्नानंतर अभिनेत्री यशस्वी होत नाहीत' असे म्हटले जात होते. तिचे भाव दाखवण्यासाठी खोट्या गोष्टींची गरज नाही. तिने तिचा अभिनय जगला आणि मग पडद्यावर जे एक्स्प्रेशन यायचे ते खरेच लोकांच्या डोळ्यात पाणी आणायचे.

आपल्या दीड दशकाच्या कारकिर्दीत मौसमी चॅटर्जीने अनेक सुपरहिट चित्रपट दिले आहेत, पण सर्वात मोठी गोष्ट म्हणजे तिने तिच्या कारकिर्दीत सर्व सुपरस्टार्ससोबत काम केले. शशी कपूर, विनोद खन्ना, विनोद मेहरा, अमिताभ बच्चन, धर्मेंद्र, जितेंद्र, राकेश रोशन यांच्यासह अनेक यशस्वी अभिनेत्यांसोबत मौसमीने स्क्रीन स्पेस शेअर केली. मात्र, १९७४ मध्ये मनोज कुमारच्या 'रोटी, कपडा और मकान' या चित्रपटाने मौसमीला तिचे खरे स्टारडम मिळाले.

आपल्या चित्रपट कारकिर्दीत चमकदार कामगिरी करणाऱ्या मौसमी हिला २०१५ साली फिल्मफेअरचा 'लाइफटाइम अचिव्हमेंट अवॉर्ड' देखील मिळाला आहे.

बॉलिवूड अभिनेत्रींसोबत अशा काही घटना घडल्या आहेत, ज्या थक्क करणाऱ्या आहेत. अभिनेत्री मौसमी चटर्जी यांच्या आयुष्यात देखील अनेक चढ-उतार आले. एक काळ असा होता, जेव्हा मौसमी चटर्जी बॉलिवूडच्या अव्वल अभिनेत्रींपैकी एक होत्या. मौसमी चटर्जी यांनी त्यांच्या काळात बॉलिवूडला अनेक हिट सिनेमे दिले. प्रोफेशनल आयुष्यात यश मिळालं असलं तरी, मौसमी चटर्जी यांच्या खासगी आयुष्यात अनेक अडचणी आल्या. महत्त्वाचं म्हणजे त्यांच्या आयुष्यात अशा काही गोष्टी घडल्या ज्यातून त्या आजही सावरल्या नाहीत. मौसमी चटर्जी यांनी लग्नानंतर बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं. करियर उच्च शिखरावर असताना मौसमी चटर्जी यांच्यावर दुखाःचा डोंगर कोसळला.

मौसमी चटर्जी यांचं लग्न वयाच्या १५ व्या वर्षी वडिलांच्या मर्जीने झालं. लग्नानंतर १६ व्या वर्षी लग्नानंतर बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं आणि यशाच्या उच्च शिखरावर असताना अभिनेत्रीने १८ व्या वर्षी मुलीला जन्म दिला. महत्त्वाची गोष्ट म्हणजे १९७४ साली प्रदर्शित झालेल्या 'रोटी कपडा मकान' सिनेमादरम्यान मौसमी प्रेग्नेंट होत्या.


आई झाल्यानंतर मौसमी चटर्जी यांची लोकप्रियता हळू-हळू कमी होवू लागली. पण मौसमी चटर्जी यांनी जेवढ्या सिनेमांमध्ये काम केलं, ते सगळे सिनेमे हिट ठरले. आजही मौसमी चटर्जी यांच्या सिनेमांची चर्चा चाहत्यांमध्ये रंगलेली असते. झगमगत्या विश्वापासून दूर झाल्यानंतर मौसमी चटर्जी यांनी एका मुलाखतीत त्यांच्या आयुष्याबद्दल मोठा खुलासा केला.

करियरच्या सुरुवातीला मुलीला जन्म दिल्यांमुळे माझं करियर संपलं असा लोकांचा समज होता. पण असा विचार मौसमी चटर्जी यांनी कधीही केला नाही. प्रोफेशनल आयुष्यासाठी त्यांनी कधीही खासगी आयुष्याला दोष दिला नाही. पण मुलीच्या निधनानंतर मौसमी चटर्जी यांना मोठा धक्का बसला.

**क्लिक...क्लिक...!**



**पनवेल : येथून काही अंतरावर असणाऱ्या रोडपालीजवळील नदी कडक उन्हामुळे अशी कोरडी दिसत आहे. पावसाळ्यात ही नदी चारही बाजूंनी भरून वाहत असते, मात्र उन्हाळात एप्रिल मे या महिन्यात ही नदी अशी कोरडी पडते.** (छाया : लक्ष्मण आडाव)






# उन्हाळ्यात दह्याऐवजी ताक पिणे अधिक फायदेशीर

उन्हाळ्यामध्ये गरम वातावरणाचा आपल्या शरीरावर परिणाम होत असतो. वाढत्या उष्णतेमुळे शरीराचे तापमान नियंत्रणात राहण्यासाठी नेहमीपेक्षा जास्त प्रमाणात घाम येत असतो. अशात शरीरामध्ये पाण्याचे प्रमाण कमी होत असते. उन्हाळ्यात डिहायड्रेशनचा त्रास होऊ नये यासाठी जास्त पाणी पिण्याचा सल्ला दिला जातो. उन्हाचा प्रभावा कमी व्हावा म्हणून लोक विविध उपाय करत असतात. काहीजण एसीच्या समोर बसून असतात. तर काही लोक शरीर थंड राहावे या उद्देशाने उसाचा रस, पन्ह, ताक, दही अशा पदार्थांचे सेवन करत असतात.

उन्हाळ्यात ताक आणि दही या दोन पदार्थांचे सर्वात जास्त सेवन केले जाते. हे दोन्ही पदार्थ आरोग्यासाठी खूप फायदेशीर असतात. दुधापासून तयार करण्यात येणाऱ्या या दोन्ही पदार्थांमध्ये पोषक घटक समाविष्ट असतात. असे असले तरी उन्हाळ्यात दही खाण्याऐवजी ताक पिणे योग्य असते असे म्हटले जाते. गरम वातावरणात दह्यापेक्षा ताक अधिक प्रभावशाली असते या विषयाबाबत आयुर्वेदामध्येही लिहिले आहे असे तज्ज्ञ सांगतात.

**दही खाल्याने त्रास होईल**

सोशल मीडियावर सध्या एक व्हिडीओ व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये उन्हाळ्यात दह्याऐवजी ताक पिणे अधिक फायदेशीर असते का याची माहिती देण्यात आली आहे. यानुसार, दही या पदार्थांचा उष्ण गुणधर्म असतो. ते गरम असते. उन्हाळ्यामध्ये उष्ण दही खाल्याने पोटाला त्रास होऊ शकतो. आयुर्वेदानुसार दही पचायला जड असते. त्यामुळे पचनाच्या समस्या निर्माण होऊ शकतात. कधी-कधी दह्याच्या सेवनाने पचनक्रिया बिघडण्याची शक्यता असते. अशा वेळी बद्धकोष्ठतेचा त्रास सुरु होऊ शकतो. दह्यामधील उष्णेतेमुळे पित्ताचा त्रास किंवा रक्तस्त्रावाचे विकार संभवतात. याउलट ताक पचायला हलके असते. त्याच्या सेवनामुळे वजन कमी करण्यासाठी मदत होते. शिवाय ते थंड असते.

# खालापुरात अद्ययावत उपजिल्हा रुग्णालय हवे

## रुग्णांची परवड थांबविण्याची स्थानिक नागरिकांची मागणी

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावर जखमींना तातडीने उपचार मिळावे यासाठी खालापूर परिसरात सुसज्ज उपजिल्हा रुग्णालयाची नितांत गरज नुकत्याच खंडाळा घाटातील भीषण बस अपघातानंतर पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

खालापूर तालुका मुंबई पुणे महानगरच्या मध्यवर्ती ठिकाणी असून मुंबई–पुणे द्रुतगती मार्ग, मुंबई–पुणे जुना महामार्ग, तसेच राज्यमार्गाचे जाळे खालापूर तालुक्यात आहे. असे असतानादेखील या ठिकाणी अत्याधुनिक सोयीसुविधांनी सुसज्ज असे रुग्णालय नसल्यामुळे कित्येक जणांना जीव गमवावा लागत आहे. नुकत्याच खंडाळा घाटात बसचा भीषण अपघातानंतर जखमींना उपचाराकरीता मुंबईला हलवण्याची वेळ आली होती.



दरवेळी तास–दीड तासांचा प्रवास करून रुग्णालय गाठून उपचार मिळेपर्यंत रुग्ण दगावण्याची शक्यता अधिक आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रात सर्वच ठिकाणी डॉक्टर, कर्मचाऱ्यांची अपुरी संख्या, आरोग्य केंद्रात सोयी, स्वच्छतेचा अभाव तसेच अत्यावशक औषधांचा तुटवडा, अत्याधुनिक यंत्रसामुग्रीची कमतरता आहे. त्यामुळे गंभीर जखमी रुग्णाला वाचविण्यासाठी पनवेल, नवी मुंबई, पुणे येथील रुग्णालयात हलविण्याचा सल्ला देतात.अशा आपत्कालीन परिस्थितीत हाकेच्या अंतरावर रुग्णालय उभे राहिल्यास कित्येक जीव वाचविणे शक्य आहे.

### निधी मंजूर, पण काम रखडले!

*दोन वर्षांपूर्वी खालापूर उपजिल्हा रुग्णालयच मंजूर झाले आहे. जवळपास १२ कोटींचा निधी मंजूर असून ३० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय देवन्हावे ग्रामपंचायत हद्दीत पाली फाटा येथे बांधण्यात येणार आहे. त्यासाठी जागेची पूर्तता देवन्हावे ग्रामपंचायतीनी करीत गावठाण जागा उपलब्ध करून दिली. कामाची निविदा निघण्यापूर्वी जागेची मोजणी करून नकाशा तयार करण्यात आला होता, परंतु मध्यंतरी मंजूर जागेत पाच गुंठे खासगी जागा निघाल्याने पुन्हा रुग्णालयाच्या कामाला खो बसला आहे.*

**जखमींना तातडीने उपचार मिळावे यासाठी खालापूर टोल नाकानजीक ट्रामा केअर सेंटरसाठी पाठपुरावा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे करणार आहे. महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाने द्रुतगती मार्ग तयार करताना संपादित केलेली जमिनीपैकी कित्येक एकर जागा शिल्लक आहे. या जागेत सुसज्ज असे ट्रामा केअर खालापूर टोल नाकानजीक व्हावे यासाठी प्रयत्न सुरू आहेत.**

**–आमदार महेंद्र थोरवे, खालापूर कर्जत विधानसभा**

# मुरूडचा गोमुख समुद्रकिनारा विकासाच्या प्रतीक्षेत




**मुरूड : प्रतिनिधी**

रायगडचे दक्षिण काशी म्हणून समजले जाणारे मुरूड जंजिरा एकदरा डोंगरापलिकडे समुद्रकाठी वसलेले शंकराचे पवित्र स्थान म्हणजे गोमुख (गायमुख). या ठिकाणी मोठ्या संख्येने पर्यटक भेट देत असल्याने या परिसराचा विकास करण्याची मागणी होत आहे.

गोमुखसमोर भव्य समुद्र, डाव्या बाजूस अभेद्य जंजिरा किल्ला, उजव्या बाजूस पद्मदुर्ग किल्ला, काळ्या खडकात डोंगराच्या कपारीत वासलेले हे गोमुख पर्यटकांना अतिशय आवडते ठिकाण आहे. शंकराचे जागरूक स्थान असल्याने महाराष्ट्रातून येथे अस्थी विसर्जनासाठी लोक येतात, मात्र अद्यापही या परिसराचा विकास झालेला नसल्याने पर्यटनाच्या दृष्टीने येथे सोयीसुविधा उपलब्ध करण्याची मागणी होत आहे.

गोमुखावर जाण्यासाठी भक्तांना एकदरा गावातील खराब रस्त्यावरून चालत जावे लागते. या रस्त्याची दुरुस्ती झाली तर पर्यटक आपली गाडी गोमुखावर घेऊन जाऊ शकतात.

## साळाव ते मुरूड रस्त्यावर अंधार

**रेवदंडा : प्रतिनिधी**

साळाव ते मुरूड रस्ता दरम्यानच्या मुख्य रस्त्यावर पथदिवे नसल्याने अंधाराचे साम्राज्य पसरले आहे. यामुळे या रस्त्यावरून रात्रीचे वेळी प्रवास करणे धोकादायक वाटते.

साळाव ते मुरूड दरम्यान फणसाड अभयारण्य असल्याने रात्री–बेरात्री एखादा हिंस्त्र प्राणी रस्त्यावर आल्यास अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या रस्त्यामध्ये रात्रीचे वेळी वाहन बंद पडल्यास मोठा पेच निर्माण होतो. त्यामुळे त्यांचा रस्ता शोधण्याबाबत गोंधळ निर्माण होतो. त्यामुळे या रस्त्याच्या दुर्तफा पथदिवे लावण्याची मागणी ग्रामस्थ करीत आहेत.

# कोलाड येथे अवैध मद्यसाठा जप्त

**अलिबाग : प्रतिनिधी**



विदेशी मद्यसाठ्याची बेकायदेशीरपणे वाहतूक करणाऱ्या दोघांना रायगड पोलिसांनी जेरबंद केले आहे. त्यांच्याकडून साडेसात लाख रुपये किमतीच्या मद्यसाठ्यासह एकूण २३ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाला मुंबई–गोवा महामार्गावर अवैध विदेशी मद्यसाठा विक्रीसाठी येणार असल्याची माहिती मिळाली होती. यानुसार पोलीस निरीक्षक दयानंद गावडे यांनी आपल्या पथकाला तातडीने कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या. यानुसार त्यांच्या पथकाने मुंबई–गोवा महामार्गावर कोलाड येथील हॉटेल अनिकेतसमोर सापळा लावला होता. त्यानुसार भारत बेन्झ कंपनीचा एक ट्रक त्या ठिकाणी दाखल झाला. या ट्रकमध्ये रॉयल ब्ल्यू कंपनीचे एक हजार १०० बॉक्स असल्याचे आढळून आले ज्याची बाजारातील किंमत ही सात लाख ७० हजार येवढी आहे. पोलिसांनी हा मद्यसाठा आणि १६ लाख रुपये किमतीचा ट्रक जप्त केला आहे.

या प्रकरणी कोलाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून महेश श्रीकृष्ण सूर्यवंशी (वय २४, रा. चिंचोळे आवार, नाशिक) आणि अनिल मोतीराम गायकवाड (वय ३६, रा. ठी. वडोदरा, गुजरात) या दोघांना अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस उपनिरीक्षक धनाजी साठे, हवालदार जितेंद्र चव्हाण, विकास खैरनार, पोलीस नाईक अक्षय जाधव, अक्षय सावंत, तर सायबर सेलचे शिपाई अक्षय पाटील यांनी या तपासात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

## चौक–कर्जत रस्त्यावर अपघात; दोघे जखमी

**चौक : प्रतिनिधी**

खालापुर तालुक्यातील भिलवले गावचे हद्दीत भरधाव वेगात येणाऱ्या कारने दोन दुचाकींना धडक दिल्याने दोघे जण जखमी झाले आहेत. आरोपी कारचालक (रा. लोणीवली, पनवेल) हा कारने कर्जतवरून चौक दिशेला जात असताना भरधाव वेगात येऊन समोरून येणाऱ्या फिर्यादी (रा. वावर्ले, खालापुर) यांच्यासह त्यांच्या शेजारी असणाऱ्या दुचाकीला धडक देत अपघात झाला. या अपघातात दोन्ही दुचाकींवरील चालक जखमी झाले असून तिन्ही वाहनांचे नुकसान झाले. याबाबत खालापूर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहेत.


### सुचना

रा. स्व. संघ जनकल्याण समितीचे डॉ. प्रभाकर पटवर्धन स्मृती रुग्णालय, पनवेल या रुग्णालयाचे एप्रिल २००८ ते मार्च २०१८ पर्यन्तचे सर्व पेशंटचे RECORD ( IPD, OPD, Dialysis व इतर) Destroy करण्यात येणार आहे. तरी या संबंधित वर्षातील माहिती कोणास हवी असल्यास जाहिरात तारखे पासून पंधरा दिवसाच्या आत रुग्णालयाशी संपर्क करावा. त्या नंतर सदर वर्षाची माहिती देण्यास रुग्णालय जबाबदार राहणार नाही.

**आपली**
**डॉ. भक्ती सारंग**
**वैदयकिय अधिक्षक**

रा.स्व. संघ जनकल्याण समिती डॉ. प्रभाकर पटवर्धन स्मृती रुग्णालय, पनवेल १९६/१, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, पनवेल ४१०२०६
मोबाईल क्र. ९३२१६३६४९७


# महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या विविध योजना

**अलिबाग : प्रतिनिधी**

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील लोकांना स्वयंरोजगारासाठी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ विविध योजना राबवित असते. या महामंडळाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

५० टक्के अनुदान योजना : प्रकल्प मर्यादा ५० हजार रु. पर्यंत, प्रकल्प मर्यादेच्या ५० टक्के किंवा जास्तीत जास्त १० हजार पर्यंत अनुदान देण्यात येते. बँक कर्जावर बँकेच्या नियमाप्रमाणे व्याज आकारण्यात येते. कर्जाची परतफेड सर्वसाधारणपणे तीन वर्षात करावयाची आहे.

दुसरी योजना बीजभांडवल योजना असून यामध्ये प्रकल्प मर्यादा ५० हजार १ ते ५ लाख रु. पर्यंत, प्रकल्प मर्यादेच्या २० टक्के बीजभांडवल कर्ज महामंडळामार्फत चार टक्के व्याज दराने देण्यात येते. राशीमध्ये महामंडळाचे अनुदानाचा रु. १० हजारचा समावेश आहे. बँकेचे कर्ज ७५ टक्के देण्यात येते व त्या कर्जावर बँकेच्या नियमाप्रमाणे व्याजदर आकारण्यात येतो, महामंडळाचे व बँकेच्या कर्जाची परतफेड एकाच वेळेस ठरवून दिलेल्या समान मासिक हप्त्यानुसार तीन ते पाच वर्षाचे आत करावी लागते. अर्जदारास पाच टक्के स्वतःचा सहभाग भरावयाचा आहे.

योजनांचा लाभ घेण्यासाठी अर्जदार अनुसूचित जाती, नवबौद्ध संवर्गातील असावा व त्याचे वय १८ वर्षापेक्षा जास्त असावे, राज्य महामंडळाच्या योजनेकरिता वार्षिक उत्पन्न मर्यादा शहरी व ग्रामीण भागाकरिता रुपये तीन लाख असावी, अर्जदार हा महामंडळाच्या कोणत्याही योजनांचा थकबाकीदार नसावा. अर्जासोबत जातीचा व उत्पन्नाचा दाखला, दोन पासपोर्ट आकाराचे फोटो, रेशनकार्ड, मतदार ओळखपत्र, रहिवाशी प्रमाणपत्र, आधारकार्ड, व पॅनकार्ड, व्यवसायाचे कोटेशन, आवश्यक असल्यास जागेचा पुरावा. व्यवसायानुरूप इतर आवश्यक दाखले, आवश्यकतेप्रमाणे प्रकल्प अहवाल, इतर दाखलेपत्र आदी कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. या योजनांच्या अधिक माहितीकरिता महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, कृष्ण संगम बिल्डींग चेंढरे अलिबाग–बायपास रोड, पहिला मजला, ब्लॉक नं.१०३ अलिबाग या कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक एस. आर. म्हसकर यांनी केले आहे.


**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

### SRM E-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical Contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender Specification:

| Sr. No. | Tender/ Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No.** EE/EHV (O&M)/DIVN/ MHD/Tech/ E-Tender-19/ 2023-24 Dtd. 26.04.2023 **RFx No. 7000027169** | **Sub:** Invitation SRM E-Tender for Work of Surveillance of MMR Region EHV connected lines for attending any abnormalities during high demand crunch period to occur in upcoming May 2023 - June 2023 under KTL S/Dn. Mahad under EHV (O&M) Division, Mahad. | Up to Rs. 14,75,118/- (Including GST+ 1% Labour Cess) |

**EMD** will be 1% of the Estimated Cost or Rs. 5,000/- whichever is the higher
**Tender Fee** will be Rs. 500/- plus GST+1% Labour Cess.
**Bid Submission is From:** 26.04.2023 @ 00:00 Hrs to 02.05.2023 @ 23:59 Hrs for above tender. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O): Phone No. 7373101089
**Note:** All eligible Suppliers/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Mahad**

### Loss of Share Certificate

This is to inform that, We are the member of the Steel Chamber Kalamboli Business & Office Premises Co-Op Society Ltd, Plot no. 514, Steel Market Complex, Kalamboli, Navi Mumbai -410218, and the said Society has issued Share Certificate No. 133 for 12 shares bearing distinctive No's from 1557 to 1568 In respect of our Office Room No. C-631 in the said Society is now misplaced or not traceable. FIR registered at kalamboli police station FIR no. 0427/2023 dt. 22/04/23 Any body having any objections to issuances of duplicate Share Certificate in lieu of the above, may please write to the said Society at below address within in 10 days.
**M/s. M P STEEL CORPORATION** , 5/8-A, Lakri Bunder Road, Darukhana, Mumbai - 400 010. **Mob. : 9324295901**


## वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

**अलिबाग :** वाहतुकीचे नियमभंग करणाऱ्या एकूण ३१७ चालकांवर मंगळवारी (दि. २४) पोलिसांनी कारवाई केली. त्यांच्याकडून दोन लाख १७ हजार रुपये इतका दंड आकारला आहे.


**सिडको** शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना
### (हक्कसोड पत्राबाबत)

सूचनेद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते कि, मौजे– रोडपाली (आंबेतखार) ता – पनवेल, जि – रायगड, येथील खालील नमूद केलेली जमीन नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादित करण्यात आलेली आहे.

| अ. क्र. | युनिट केस/निवाडा क्र. | सर्व्हे क्र./ हिस्सा क्र. | संपादित क्षेत्र हे. आर | निवाडा | सी. सी. वरील नावे |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | रोडपाली (आंबेतखार) ९२ | ४३७/ २४६ | १–१३–० | १) गोपीकाबाई नारायण कोळी व इतर<br>२) वासुदेव गोविंद नाखवा<br>३) अर्जुन बापूजी विचारे<br>४) रामचंद्र दामोदर कोळी<br>५) दत्तात्रय चंद्राजी मांडवीकर<br>६) भारतीबाई नारायण कोळी<br>७) चंद्रप्रभा मधुकर मांडवीकर<br>८) कृष्णाबाई गोविंद नाखवा<br>९) काशीबाई महादेव कोळी<br>१०) वसंत लक्ष्मण बानवलकर<br>११) दत्तात्रेय गोविंद नाखवा<br>१२) मधुकर शिवराम नाखवा | १) गोपीकाबाई नारायण कोळी व इतर<br>२) रामचंद्र दामोदर कोळी<br>३) भारती नारायण कोळी<br>४) चंद्रभागा मधुकर मांडवीकर<br>५) दत्तात्रय चंद्राजी मांडवीकर<br>६) कृष्णाबाई गोविंद नाखवा<br>७) काशीबाई महादेव कोळी<br>८) अर्जुन बापूजी विचारे<br>९) वसंत लक्ष्मण बानवलकर<br>१०) दत्तात्रेय गोविंद नाखवा<br>११) मधुकर शिवराम नाखवा<br>यांचे अकत्यारी वासुदेव गोविंद नाखवा व स्वत: |
| ०२ | रोडपाली (आंबेतखार) ८७ | ४३७/ २४१ | ०–९९–२ | १) नारायण धर्मा कोळी<br>२) वासुदेव गोविंद नाखवा<br>३) अर्जुन बापूजी विचारे<br>४) रामचंद्र दामोदर कोळी<br>५) दत्तात्रय चंद्राजी मांडवीकर<br>६) भारतीबाई नारायण कोळी<br>७) चंद्रप्रभा मधुकर मांडवीकर<br>८) कृष्णाबाई गोविंद नाखवा<br>९) काशीबाई महादेव कोळी<br>१०) वसंत लक्ष्मण बानवलक<br>११) दत्तात्रेय गोविंद नाखवा<br>१२) मधुकर शिवराम नाखवा | १) गोपीकाबाई नारायण कोळी व इतर<br>२) रामचंद्र दामोदर कोळी<br>३) भारती नारायण कोळी<br>४) चंद्रभागा मधुकर मांडवीकर<br>५) दत्तात्रय चंद्राजी मांडवीकर<br>६) कृष्णाबाई गोविंद नाखवा<br>७) काशीबाई महादेव कोळी<br>८) अर्जुन बापूजी विचारे<br>९) वसंत लक्ष्मण बानवलकर<br>१०) दत्तात्रेय गोविंद नाखवा<br>११) मधुकर शिवराम नाखवा यांचे अकत्यारी वासुदेव गोविंद नाखवा व स्वत: |

मौजे रोडपाली, संचिका क्र. १७७ मधील **भूधारक नारायण धर्मा कोळी व इतर** यांस **१८५० चौ.मी** मंजूर पात्रतेपोटी **भूखंड क्र. ११, सेक्टर ११, मौजे रोडपाली येथे १८५० चौ.मी.** क्षेत्रफळाचा भूखंड इरादित झाला आहे. व त्यांना दि. ०३/०६/२००२ रोजी वाटपपत्र देण्यात आला आहे.

भूधारकांनी अर्जामध्ये केलेल्या मागणीनुसार मा. वरीष्ठ नियोजनकार (विशेष योजना) यांनी अपिल ५४७/२०१६ दाव्याच्या आदेशाच्या अनुषंगाने कळविल्यानुसार इरादित कळंबोली नोड भूखंड क्र.११, से. ११, क्षेत्र १८५० चौ.मी.पैकी श्री. गजानन पाटील यांच्या हिश्यास येणारे २०० चौ.मी. क्षेत्रफळ राखीव ठेवून उर्वरित क्षेत्र त्याच भूखंडावर म्हणजेच कळंबोली नोड भूखंड क्र.११, से. ११, क्षेत्र १६४०.२१ चौ.मी. चे समंत सिमांकन करुन दिले आहे. त्यानुसार उपरोक्त दाव्याच्या अनुषंगाने भूधारकांनी नोंदणीकृत हक्कसोडपत्रक सादर केली असून ती खालील प्रमाणे

**१) सह–दुय्यम निबंधक पनवेल –४ यांचेकडील नोंदणीकृत हक्कसोड पत्र क्र. ७८०९/२०१५**

| हक्क व हितसंबंध सोडून दिलेल्या व्यक्तिंची नावे | हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तिंची नावे |
|---|---|
| १. श्रीमती शैजला रामचंद्र कोळी<br>२. सौ. सविता सुरेश तांबे<br>३. श्री. सतिश रामचंद्र कोळी | १. सौ. लतिका कृष्णा शिवकर उर्फ लतिका रामचंद्र कोळी |

**२) सह–दुय्यम निबंधक पनवेल –५ यांचेकडील नोंदणीकृत हक्कसोड पत्र क्र. ६५८०/२०२०**

| हक्क व हितसंबंध सोडून दिलेल्या व्यक्तिंची नावे | हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तिचे नाव |
|---|---|
| १. श्रीमती. हेमलता वसंत कोळी २. श्री. अतुल वसंत कोळी<br>३. श्री. अभय वसंत कोळी ४. श्रीमती मंदाकिनी मच्छींद्र नाखवा<br>५. श्रीमती अलकनंदा प्रभाकर ठाणेकर ६. श्रीमती वनमाला नारायण कोळी<br>७. श्रीमती पदमा उर्फ असावरी अनिल ठाणेकर<br>८. श्रीमती पुष्पा नारायण कोळी | १. श्री. अरुण नारायण कोळी |

**३) सह–दुय्यम निबंधक पनवेल –५ यांचेकडील नोंदणीकृत हक्कसोड पत्र क्र. ९७६८/२०२०**

| हक्क व हितसंबंध सोडून दिलेल्या व्यक्तिंची नावे | हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तिचे नाव |
|---|---|
| १. सौ. मंगल अजित सोमवे २. श्री. अभय दत्तात्रय मांडवीकर<br>३. सौ. स्वाती देवेंद्र पाटील | १. सौ. संध्या शेखर ढोबळे |

**४) सह–दुय्यम निबंधक पनवेल –५ यांचेकडील नोंदणीकृत हक्कसोड पत्र क्र. ९७६५/२०२०**

| हक्क व हितसंबंध सोडून दिलेल्या व्यक्तिंची नावे | हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तिचे नाव |
|---|---|
| १. श्रीमती ज्योती वासुदेव नाखवा<br>२. श्रीमती निलीमा वासुदेव नाखवा उर्फ निलीमा अविनाश मांडवीकर<br>३. श्री. सिध्देश्वर वासुदेव नाखवा | १. श्री. ज्ञानेश्वर वासुदेव नाखवा |

**५) सह–दुय्यम निबंधक पनवेल –५ यांचेकडील नोंदणीकृत हक्कसोड पत्र क्र. १००६/२०२१**

| हक्क व हितसंबंध सोडून दिलेल्या व्यक्तिंची नावे | हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तिचे नाव |
|---|---|
| १. श्री. उल्हास गोविंद नाखवा २. श्री. नितीन गोविंद नाखवा<br>३. श्री. वेदांत राजन नाखवा ४. श्रीमती. सरोज राजन नाखवा | १. श्री. गौरव राजन नाखवा |

**६) सह–दुय्यम निबंधक पनवेल –५ यांचेकडील नोंदणीकृत हक्कसोड पत्र क्र. ८६४३/२०२०**

| हक्क व हितसंबंध सोडून दिलेल्या व्यक्तिंची नावे | हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तिंची नावे |
|---|---|
| १. श्रीमती कुंदा देवेंद्र कोळी २. श्री. हेमंत कृष्णा नाखवा (कोळी)<br>३. श्रीमती निलम मकरंद झवेरी ४. श्रीमती वसुधा सदानंद नाखवा<br>५. श्रीमती करुणा (क्षमा) पंढरीनाथ कोळी ६. श्री. राजेंद्र महादेव कोळी<br>७. श्री. विवेक धर्माजी तरे ८. श्रीमती मिता महेंद्र वाटकरे<br>९. श्रीमती हेमलता महादेव कोळी उर्फ हेमलता वसंत कोळी | १. श्रीमती प्रतिभा विश्वनाथ तिघडी<br>२. श्री. कुनाल देवेंद्र कोळी |

**७) सह–दुय्यम निबंधक पनवेल –५ यांचेकडील नोंदणीकृत हक्कसोड पत्र क्र. ११०४८/२०२०**

| हक्क व हितसंबंध सोडून दिलेल्या व्यक्तिंची नावे | हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तिंची नावे |
|---|---|
| १. श्रीमती प्रणाली परमानंद बानवलकर २. प्राची गोविंद फणसेकर<br>३. श्रीमती. पुजा अवधूत बानवलकर ४. श्रीमती. धनश्री अवधूत बानवलकर<br>५. श्री. दीनानाथ वसंत बानवलकर ६. श्रीमती इंदीरा मंगेश पंडीत उर्फ इंदीरा नारायण पंडीत<br>७. श्रीमती माधवी प्रमोद देशपांडे ८. श्रीमती मीना (मीनाक्षी) सदगुरु गायतोंडे | १. श्री. हृषीकेश अवधूत बानवलकर<br>२. श्रीमती वैदेही परमानंद बानवलकर |

**८) सह–दुय्यम निबंधक पनवेल –५ यांचेकडील नोंदणीकृत हक्कसोड पत्र क्र. २०४९१/२०२२**

| हक्क व हितसंबंध सोडून दिलेल्या व्यक्तिंची नावे | हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तिचे नाव |
|---|---|
| १. श्रीमती जनाबाई दत्ताराम नाखवा २. श्री. विजय दत्ताराम नाखवा | १. श्री. अविनाथ दत्ताराम नाखवा |

**९) सह–दुय्यम निबंधक पनवेल –५ यांचेकडील नोंदणीकृत हक्कसोड पत्र क्र. १००७/२०२१**

| हक्क व हितसंबंध सोडून दिलेल्या व्यक्तिंची नावे | हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तिचे नाव |
|---|---|
| १. श्री. प्रकाश नारायणराव कोळी २. श्री. सुरेश नारायणराव कोळी<br>३. सौ अंजली रामकुमार राठोड | १. श्री. अजित नारायणराव कोळी |

**उपरोक्त हक्कसोडपत्रकानुसार सर्व हक्कसोड व हक्कप्रदान केलेल्या भूधारकांचा तपशील खालीलप्रमाणे**

| हक्क व हितसंबंध सोडून दिलेल्या व्यक्तिंची नावे | हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तिंची नावे |
|---|---|
| १. श्रीमती शैजला रामचंद्र कोळी २. सौ. सविता सुरेश तांबे<br>३. श्री. सतिश रामचंद्र कोळी ४. श्रीमती. हेमलता वसंत कोळी<br>५. श्री. अतुल वसंत कोळी ६. श्री. अभय वसंत कोळी<br>७. श्रीमती मंदाकिनी मच्छींद्र नाखवा ८. श्रीमती अलकनंदा प्रभाकर ठाणेकर<br>९. श्रीमती वनमाला नारायण कोळी १०. श्रीमती पदमा उर्फ असावरी अनिल ठाणेकर<br>११. श्रीमती पुष्पा नारायण कोळी १२. सौ. मंगल अजित सोमवे<br>१३. श्री. अभय दत्तात्रय मांडवीकर १४. सौ. स्वाती देवेंद्र पाटील<br>१५. श्रीमती ज्योती वासुदेव नाखवा १६. श्रीमती निलीमा वासुदेव नाखवा उर्फ निलिमा अविनाश मांडवीकर<br>१७. श्री. सिध्देश्वर वासुदेव नाखवा १८. श्री. उल्हास गोविंद नाखवा<br>१९. श्री. नितीन गोविंद नाखवा २०. श्री. वेदांत राजन नाखवा<br>२१. श्रीमती सरोज राजन नाखवा २२. श्रीमती कुंदा देवेंद्र कोळी<br>२३. श्री. हेमंत कृष्णा नाखवा (कोळी) २४. श्रीमती निलम मकरंद झवेरी<br>२५. श्रीमती वसुधा सदानंद नाखवा २६. श्रीमती करुणा (क्षमा) पंढरीनाथ कोळी<br>२७. श्री. राजेंद्र महादेव कोळी २८. श्री. विवेक धर्माजी तरे<br>२९. श्रीमती मिता महेंद्र वाटकरे ३०.श्रीमती हेमलता महादेव कोळी उर्फ हेमलता वसंत कोळी<br>३१. श्रीमती प्रणाली परमानंद बानवलकर ३२. प्राची गोविंद फणसेकर<br>३३. श्रीमती. पुजा अवधूत बानवलकर ३४. श्रीमती. धनश्री अवधूत बानवलकर<br>३५. श्री. दीनानाथ वसंत बानवलकर ३६. श्रीमती इंदीरा मंगेश पंडीत उर्फ इंदीरा नारायण पंडीत<br>३७. श्रीमती माधवी प्रमोद देशपांडे ३८. श्रीमती मीना (मीनाक्षी) सदगुरु गायतोंडे<br>३९. श्रीमती. जनाबाई दत्ताराम नाखवा ४०. श्री. विजय दत्ताराम नाखवा<br>४१. श्री. प्रकाश नारायणराव कोळी ४२. श्री. सुरेश नारायणराव कोळी<br>४३. सौ. अंजली रामकुमार राठोड | १.लतिका कृष्णा शिवकर उर्फ लतिका रामचंद्र कोळी<br>२. श्री. अरुण नारायण कोळी<br>३. सौ. संध्या शेखर ढोबळे<br>४. श्री. ज्ञानेश्वर वासुदेव नाखवा<br>५. श्री. गौरव राजन नाखवा<br>६. श्रीमती प्रतिभा विश्वनाथ तिघडी<br>७. श्री. कुनाल देवेंद्र कोळी<br>८. श्री. हृषीकेश अवधूत बानवलकर<br>९. श्रीमती वैदेही परमानंद बानवलकर<br>१०. श्री. अविनाथ दत्ताराम नाखवा<br>११. श्री. अजित नारायणराव कोळी |

उपरोक्त हक्कसोडपत्र विचारात घेवून ज्यांनी इरादित भूखंडामधील हक्क व हितसंबंध सोडून दिलेले आहेत. त्यांची नावे वगळून ज्यांना जे हक्क प्रदान करण्यात आलेले आहेत, अशा व्यक्तींच्या नावे सिडकोकडून भूखंडाचे वाटप व आवश्यक तो करारनामा करून भूखंडाचा ताबा आजच्या तारखेपासून ३० दिवसानंतर कोणत्याही दिवशी देण्याचे प्रस्तावित आहे.

वरील इरादित केलेल्या भूखंडा संदर्भात वर नमुद केलेल्या म्हणजेच ज्यांचे लाभात हक्क व अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत त्या भूधारकांना सदर योजनेनुसार या पुढे साडेबारा टक्के योजने संदर्भातील लाभ देणेची पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यासंदर्भात जर कोणाची हरकत/तक्रार असेल तर त्यांनी सदर हरकत/तक्रारीच्या समर्थनार्थ सक्षम न्यायालयाचे आवश्यक ते आदेश प्राप्त करून सदर आदेशाच्या साक्षांकित प्रतीसह मुख्य भूमी व भूमापन अधिकारी, ७ वा मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई यांचे कार्यालयात या सूचनेच्या तारखेपासून ३० (तीस) दिवसांच्या आत सर्व पुरावे व योग्य त्या कागदपत्रांसह दाखल करावेत. वर नमूद केल्याप्रमाणे वाजवी पुरावा असणारी कोणतीही हरकत/तक्रार सदर मुदतीत प्राप्त न झाल्यास सदर योजने अंतर्गत सिडकोद्वारे करण्यात येणाऱ्या पुढील कायदेशीर कार्यवाहीबद्दल कोणाचीही हरकत नाही असे समजुन वरील इरादित भूखंडाबाबत सिडकोतर्फे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**अति. भूमी व भूमापन अधिकारी (रायगड)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**
**सिडको/जनसंपर्क/०५०/२०२३–२४**

# शैक्षणिक शिष्यवृत्ती योजनेला वेग

## नवी मुंबईत २० हजार ४७ विद्यार्थ्यांना लाभ

**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिकेच्या वतीने पहिली ते महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विविध घटकांतील २० हजार ४७ पात्र विद्यार्थ्यांना सन २०२१-२२ वर्षाची शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आलेली असून १५ कोटी ८१ लक्ष २० हजार रुपये इतकी रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करणेकरिता स्टेट बँक ऑफ इंडियाच्या नवी मुंबई महापालिका मुख्यालय शाखेत पाठविण्यात आलेली आहे व बँकेमार्फत विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात रक्कम जमा व्हायला सुरूवात झालेली आहे.

नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रामधील विविध घटकांतील इयत्ता पहिली ते महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सन २०२१-२२ व सन २०२२-२३ या वर्षासाठी शिष्यवृत्ती योजना जाहीर करण्यात आली होती. या दोन वर्षांच्या शिष्यवृत्ती योजनेसाठी ३३ कोटी २५ लाख रुपयांची तरतूदही करण्यात आलेली आहे.

या शिष्यवृत्तीचा लाभ विद्यार्थ्यांना जलद मिळावा यादृष्टीने समाजविकास विभागाने कार्यवाही करण्याच्या महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या निर्देशानुसार, अतिरिक्त आयुक्त संजय काकडे यांच्या नियंत्रणाखाली सुयोग्य नियोजन करण्यात आले. दोन वर्षांसाठी प्राप्त ७१ हजारांहून अधिक अर्जांची पडताळणी, छाननी हे काहीसे जिकरीचे काम विहित वेळेत करण्याच्या दृष्टीने समाजविकास विभागाचे उपआयुक्त डॉ. श्रीराम पवार यांनी समाजसेवा अधिकारी सर्जेराव परांडे व इतर कर्मचाऱ्यांच्या सहयोगाने कालबध्द आखणी केली व तिची काटेकोर अंमलबजावणी केली, त्यामुळेच सन २०२१-२२ ची २० हजार ४७ पात्र विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती वितरण प्रक्रिया पूर्ण झालेली आहे.



शैक्षणिक शिष्यवृत्ती योजनेसाठी सन २०२१-२२ साठी ३४,३१८ तसेच सन २०२२-२३ या वर्षासाठी ३७,५५७ अशाप्रकारे दोन वर्षांसाठी एकूण ७१,८७५ अर्ज प्राप्त झाले आहेत. केवळ १५ दिवसांत जलदगतीने अर्जांची छाननी करून सन २०२१-२२ या वर्षासाठी २०,०४७ पात्र विदयार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली. सन २०२१-२२ चे ३९० प्रलंबित अर्ज दुरुस्तीसाठी लाभार्थ्यांना परत पाठविण्यात आलेले असून या संदर्भात त्यांना एसएमएसद्वारे कळविण्यात आलेले आहे.

### २१,६७५ अर्जांची पडताळणी पूर्ण

**दुसऱ्या टप्प्यातील सन २०२२-२३ या वर्षाच्या शिष्यवृत्तीकरिता प्राप्त ३७,५५७ विदयार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्जांची पडताळणी सुरू करण्यात आलेली असून २१,६७५ अर्जांची पडताळणी पूर्ण झालेली आहे. उर्वरित १५,८८२ अर्जांची छाननी पूर्ण करण्यात येईल. महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी दिलेल्या उददिष्टानुसार ३० एप्रिलपर्यंत सन २०२२-२३ वर्षाचीही शैक्षणिक शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याची कार्यवाही पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आलेले असून त्यानुसार कालबध्द कार्यवाही सुरू असल्याची माहिती समाजविकास विभागाचे उपआयुक्त डॉ. श्रीराम पवार यांनी दिली आहे.**

# खारघरच्या रामशेठ ठाकूर कॉलेजमध्ये संशोधनपर व्याख्यान

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात २४ ते २८ एप्रिलदरम्यान महाविद्यालयात वर्कशॉप व सेमिनार समिती व अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने पाच दिवसीय बहुविद्याशाखीय राष्ट्रीय पातळीवर फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रामचे आयोजन केले आहे.



२५ एप्रिल रोजी फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम अंतर्गत दोन सत्रांचे आयोजन केले होते. सकाळी १०.३० वाजता प्रथम सत्राचे आयोजन संशोधन पद्धती व संशोधनासाठी लागणारी प्रश्नावली या विषयावरती केले होते. या सत्रासाठी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. श्रद्धा भोमे (उपप्राचार्य, ज्ञानसाधना कॉलेज ठाणे) यांनी सहभागी प्राध्यापकांना मार्गदर्शन केले. तसेच त्याच दिवशी दुपारी संशोधन लेख कसा लिहायचा व तो यूजीसी केअर लिस्टेड व स्कोपस जर्नलमध्ये कसा पब्लिश करायचा या विषयावरती द्वितीय सत्राचे आयोजन केले होते. या सत्रासाठी व्याख्याते म्हणून डॉ. एम. गुरुसामी यांनी सहभागी प्राध्यापकांना मार्गदर्शन केले.

या दोन्ही सत्रांचा रामशेठ ठाकूर महाविद्यालयातील तसेच इतर मुंबई विद्यापीठात संलग्नित व स्वायत्त महाविद्यालयातील सुमारे ५० प्राध्यापकांनी लाभ घेतला. प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी प्रमुख वक्त्यांचे महाविद्यालयाच्या वतीने स्वागत केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी व प्रा. महेश्वरी झिरपे (समन्वयक अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष) उपस्थित होते. दोन्ही सत्रांमध्ये सूत्रसंचालन प्रा. गायत्री काळे व प्रा. डॉ. धनवी आवटे यांनी आभार मानले.

# प्रकल्पग्रस्तांच्या घरांवरील मालमत्ता कराची शास्ती भरण्यास स्थगिती

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका क्षेत्रात असलेल्या गावांमध्ये परवानगी न घेता गरजेपोटी बांधलेल्या प्रकल्पग्रस्तांच्या घरांना मालमत्ता करावर लावण्यात आलेली शास्ती माफ करावी, अशी विनंती लोकप्रतिनिधींकडून वारंवार प्राप्त होत होती. ही शास्ती महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम २६७ अ नुसार लावण्यात आलेली असल्याने याविषयी महापालिकेच्या वतीने महाराष्ट्र शासनाकडून मार्गदर्शन मागविण्यात आले होते.

या अनुषंगाने महापालिका आयुक्त यांना महाराष्ट्र महापालिका अधिनियमान्वये असलेल्या अधिकाराचा वापर करून प्रकल्पग्रस्तांच्या गरजेपोटी बांधलेल्या अवैध घरांच्या मूळ मालमत्ताकरावर अधिनियमातील कलम २६७ अ अन्वये आकारण्यात आलेली दुप्पट शास्ती जमा करण्यास शासन स्तरावरून निर्णय प्राप्त होईपर्यंत तात्पुरती स्थगिती देण्यात येत असल्याचे महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी परिपत्रकान्वये जाहीर केले असल्याची माहिती मालमत्ताकर विभागाच्या प्रमुख तथा अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले यांनी दिली आहे.

प्रकल्पग्रस्तांनी संबधीत विभाग कार्यालयात नमुन्यातील अर्ज आपले मालमत्ता कर देयक सोबत जोडून सादर करणे आवश्यक आहे. या निर्णयाबद्दल लोकप्रतिनिधी, प्रकल्पग्रस्तांकडून समाधान व्यक्त केले.

# वंडर्स पार्कचे काम अंतिम टप्प्यात

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका हद्दीतील नेरूळमधील वंडर्स पार्क गेल्या दोन वर्षांपासून विविध फेरबदल व म्युझिकल फाऊंटन वुईथ लेझर शो या कामासाठी बंद असुन तो लवकरात लवकर चालु करावा अशी नागरिकांची मागणी असल्याने स्थानिक माजी नगरसेवक तथा सभागृह नेते रवींद्र इथापे यांनी संबंधित अधिकारी व ठेकेदार यांच्यासमवेत वंडर्स पार्कमधील कामांची पाहणी केली.

वंडर्स पार्कमधील सर्व कामे संपत आली असुन विद्युत सब स्टेशनचे काम व परवानगीदेखील येत्या आठ दिवसांत येईल व येत्या दहा-बारा दिवसांत वंडर्सपार्क नागरिकांसाठी खुला केला जाईल असे रवींद्र इथापे यांनी सांगितले. या वेळी कार्यकारी अभियंता गिरीश गुमास्ते, उपअभियंता पंढरीनाथ चवडे, उपअभियंता मोरस्कर, रणजित नाईक व इतर अधिकारी उपस्थित होते.



# सानपाडा प्रभाग ३०मध्ये वृक्षछाटणी करण्याची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

सानपाडा नोडमधील प्रभाग ३० येथील सानपाडा कारशेड, सानपाडा नोडमधील सेक्टर २,७, ८,९, १० (काही भाग), सेक्टर ११, १२, १५, १६, १६ ए, १७, १८, १९, २०, जुईनगर रेल्वे स्थानक व इतर परिसरातील वृक्षछाटणी करण्याची लेखी मागणी भारतीय जनता युवा मोर्चा, नवी मुंबईचे जिल्हा उपाध्यक्ष आणि अखिल भारतीय माथाडी संघटनेचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष पांडुरंग आमले यांनी महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्याकडे एका निवेदनातून केली आहे.

पावसाळा आता जेमतेम सव्वा महिन्यावर आलेला आहे. सानपाडा नोडमधील प्रभाग ३० येथील सानपाडा कारशेड, सानपाडा नोडमधील सेक्टर २,७, ८,९, १० (काही भाग), सेक्टर ११, १२, १५, १६, १६ ए, १७, १८, १९, २०, जुईनगर रेल्वे स्थानक व इतर परिसराचा समावेश होत आहे. येथे जुईनगर रेल्वे स्थानक व इतर परिसरातील अंर्तगत व बाह्य भागातील तसेच सार्वजनिक ठिकाणच्या वृक्षांच्या धोकादायक व ठिसूळ झालेल्या फांद्यांची छाटणी करण्याची मागणी आमले यांनी महापालिका प्रशासनाकडे केली आहे.

येथे अनेक रिक्षा स्टॅण्ड असल्याने रिक्षाही उभ्या असतात. तसेच पादचाऱ्यांची रस्त्यावर वर्दळही असते. ठिकठिकाणी रस्त्याच्या दोन्ही बाजूला वृक्ष आहेत. त्यामुळे ठिसूळ झालेल्या फांद्या पडल्यास वाहनांचे नुकसान होऊ शकते. तसेच रस्त्यावरून चालणाऱ्या पादचाऱ्यांच्या जिवितहानीचीही भीती आहे. त्यामुळे लवकरात लवकर वृक्षछाटणीचे निर्देश देण्याची मागणी पांडुरंग आमले यांनी महापालिका प्रशासनाकडे केली आहे.

# पनवेलमध्ये 'जागर समतेचा'

## पथनाट्यातून विविध योजनांबाबत जनजागृती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त १ एप्रिल ते १ मे २०२३ या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करून सामाजिक समता पर्व कार्यक्रम साजरा करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने समाज कल्याण विभागाच्या विविध योजना मागासवर्गीय जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी पनवेल बसस्थानकात जागर समतेचा या पथनाट्यातून विविध लोकोपयोगी योजनांबाबत व्यापक स्वरुपात जनजागृती करण्यात आली.



समाज कल्याण सहाय्यक आयुक्त सुनील जाधव, जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली जागर समतेचा या पथनाट्यातून सामाजिक न्याय विभागाच्या अनूसूचित जातीतील नवउद्योजकांना स्टँडअप इंडिया योजनेंतर्गत मार्जिन मनी, पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना, गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल पुरविणे, अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता बचतगटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांचा पुरवठा करणे, वृध्दाश्रम योजना, कन्यादान योजना, रमाई आवास घरकुल योजना अशा विविध लोकोपयोगी योजनांबाबत व्यापक स्वरुपात जनजागृती करण्यात आली.

या पथनाट्यात विनोद नाईक, सार्थक गायकवाड, तुषान मढवी, हर्षदा होगाडे, समृद्धी पाटील, नेहा पाटील, श्वेता खारकर, निशांत नवाखारकर आदी कलाकार सहभागी झाले होते. या पथनाट्याचे नेतृत्व राष्ट्रीय युवा पुरस्कार्थी तथा प्रिझम सामाजिक विकास संस्थेच्या अध्यक्षा तपस्वी नंदकुमार गोंधळी यांनी केले.

या वेळी या कार्यक्रमास एसटी बस स्थानक पनवेलचे श्री. म्हात्रे, कार्यालय अधीक्षक, मुलींचे शासकीय वसतिगृह, पनवेल व पाली-सुधागड मिनाक्षी नरहरे, समतादूत पनवेल सदानंद जाधव, समतादूत पनवेल रागिणी साखरकर यांसह बहुसंख्य प्रवासी उपस्थित होते.

# आग्रोळी येथे महिलांसाठी मोफत प्रशिक्षण शिबिर

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महापालिका समाज विकास विभाग, सप्तकन्या सेवाभावी संस्था आणि वोकस्किल यांच्या संयुक्त विद्यमाने सीबीडी-बेलापूर क्षेत्रातील रहिवासी महिलांना सक्षम करणे हेतू विविध प्रकारचे कोर्सेसचे प्रशिक्षण शिबिर मोफत राबवले जात आहेत. त्याअंतर्गत आग्रोळी सेक्टर २९ येथे शिवसेना नवी मुंबई जिल्हा संघटक सरोज रोहिदास पाटील यांच्या पुढाकाराने पहिल्या टप्यात गरजू महिलांना मेकअप, हेअर स्टाईल आणि मेहंदी कोर्सेसचे तीन दिवसीय प्रशिक्षण सुरू केले आहे.



या वेळी आयोजित कार्यक्रमात नवी मुंबई मनपा सचिव चित्रा बाविस्कर, योजना विभागाचे अधिकारी सर्जेराव परांडे, प्रकल्प अधिकारी प्रकाश कांबळे यांनी सदर प्रशिक्षण शिबिरात सहभागी होऊन स्वतःचा व्यवसाय करू इच्छिणाऱ्या युवती-महिलांना माहिती दिली. या वेळी शिवसेना नवी मुंबई उपजिल्हा प्रमुख रोहिदास पाटील, उपजिल्हा प्रमुख मथुरा पाटील, गीता पाटील जयश्री शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी सुमारे दीडशे महिलांनी सहभाग घेतला. प्रशिक्षण यशस्वीतेसाठी साधना कातकरी, विनोदीनी पाटील, सुषमा कदम, संगीता ठाकरे आदींनी मोलाचे सहकार्य केले.

# हापूसची आवक घटल्याने दरवाढ

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सुरुवातीला समाधानकारक पाऊस पडल्याने हापूसचे उत्पादन चांगले असेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत होती, परंतु अवकाळी पाऊस आणि हवामानबदलाने उत्पादन कमी झाले आहे. फेब्रुवारी-मार्चमध्ये आवक जादा होती, मात्र आता मुख्य हंगाम असूनही आवक कमी आहे. त्यामुळे मागील आठवड्याच्या तुलनेत हापूसची प्रतिपेटी २००-५०० रुपयांनी दरवाढ झाली आहे. त्यामुळे आता ४-६ डझनांच्या पेटीला २२०० ते ५००० रुपये दर आहे.



एपीएमसी बाजारात जानेवारी-फेब्रुवारी महिना सुरू होताच अवीट गोडीसाठी प्रसिद्ध असलेला हापूस दाखल होण्यास सुरुवात होत असते. या वर्षी फेब्रुवारी-मार्चमध्ये मोठ्या प्रमाणात हापूस दाखल झाल्यामुळे पुढील कालावधीतदेखील हापूसला सुगीचे दिवस येतील अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती, मात्र या वर्षी अवकाळी पावसाने हापूसच्या उत्पादनावर परिणाम झालेला आहे. मोठ्या प्रमाणात हापूस दाखल होईल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत होती. मात्र हवामानबदलाच्या परिणामी उत्पादनात घट झाली. त्यामुळे यंदा आवक घटली आहे.

एप्रिलमध्ये हापूसच्या मुख्य हंगामाला सुरुवात होत असते. एप्रिल-मेदरम्यान बाजारात मोठ्या प्रमाणावर हापूस दाखल होतो. परंतु यंदा फेब्रुवारी-मार्चमध्ये आवक जास्त होती तर आता आवक कमी होत आहे. सोमवारी बाजारात कोकणातील हापूसच्या १८ हजार ५२६ पेट्या दाखल झाल्या, तर इतर राज्यांतील २१ हजार ९४२ पेट्या दाखल झाल्या आहेत. मागील आठवड्याच्या तुलनेत हापूसची आवक कमी झाली असून, त्यामुळे दर वधारले आहेत. आधी २-४ डझनांच्या पेटीला २ हजार ते ४ हजार ५०० रुपये दर होता, परंतु सोमवारी २ हजार २०० ते ५ हजार रुपयांनी विक्री होत आहे.

# फुंडे हायस्कूलच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**उरण : बातमीदार**

उरण तालुक्यातील तू. ह. वाजेकर विद्यालय फुंडे येथील सन १९८७ इयत्ता सातवीच्या बॅचमधील माजी विध्यार्थ्यांचा स्नेहमेळावा शुभम फार्म हाऊस तारा (ता. पनवेल) येथे नुकताच मोठ्या उत्साहात झाले.



या वेळी सुमारे ३५ वर्षांनंतर जवळपास २३ माजी विद्यार्थी एकत्र येत शाळेतील बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला. माजी विद्यार्थ्यांनी सातवी नंतरच्या ३५ वर्षाच्या जीवन प्रवासातील अनुभव व बालपणीच्या आठवणींना उजाळा दिल्याने सर्वांचे चेहरे आनंदाने फुलून गेले. एका लग्नामध्ये चार मित्र-मैत्रिणी एकत्र आल्यानंतर एक व्हॉट्सअॅप ग्रुप बनवण्यात आले व सदरच्या व्हॉट्सअॅप ग्रुपवर स्नेहमेळावा करण्याचे ठरले. या मधील बरेचसे माजी विद्यार्थी हे वकील, इंजिनिअर, स्वतःच्या मालकीचे ट्रान्सपोर्ट लाईन, पोर्ट कंपनीमध्ये उच्च पदावर काम करीत आहेत. तसेच सामाजिक, राजकीय क्षेत्रात काम करीत आहेत.

या वेळी मनोज भगत, देवेंद्र शा. पाटील, महादेव पाटील, देवेंद्र नि. पाटील, प्रणिता ठाकूर, प्रतिभा म्हात्रे, विद्या पाटील, जयश्री पाटील, प्रेमा पाटील, धर्मेंद्र घरत, दिनेश भोईर, नितीन म्हात्रे, किशोर ठाकूर, रमाकांत ठाकूर, अजय पाटील, राजेंद्र कडू, भानुदास तांडेल, भुवेश तांडेल, सुनील तांडेल, विजय मढवी, विनय ठाकूर, किशोर घरत आदी माजी विद्यार्थी उत्साहात सहभागी झाले होते.

# उरण नगर परिषदेच्या वाचनालयात जागतिक पुस्तक दिनानिमित्त व्याख्यान

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

जागतिक पुस्तक दिनानिमित्त उरण नगर परिषदचे मॉसाहेब मिनाताई ठाकरे वाचनालय येथे उरण नगर परिषदचे मुख्याधिकारी राहूल इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली संतोष पवार, ग्रंथपाल आणि सहकारी जयेश वत्सराज यांनी वाचनालयात नियमित येणारे विद्यार्थी आणि वाचक यांच्या उपस्थितीत हेमंत मोतीराम कांबळे यांचे व्याख्यान आयोजित केले होते.



व्याख्यान अतीशय प्रेरणादायी झाले. व्याख्यान संपल्यावर वाचनालयातील प्रत्येक विद्यार्थ्याने उत्स्फूर्तपणे आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाला व्याख्याते हेमंत मोतीराम कांबळे, ग्रंथपाल संतोष पवार, जयेश वत्सराज, निवृत्त मुख्याध्यापक पी डब्ल्यू पाटील, माजी सैनिक जयेश पाटील, निवृत्त शिक्षक चौधरी, ज्येष्ठ नागरिक गजानन जुवेकर उपस्थित होते तसेच विद्यार्थी इम्रान खान, रूची गुप्ता, सायली सात्विलकर, रोहीत प्रसाद, रजत रंजन, ज्ञानेश्वर कदम, शुभम गौडदाब अजित आपटे आदी उपस्थित होते.

## निवडक

### मानसी चापेकरांच्या कवितासंग्रहाचे प्रकाशन



**रोहे** : प्रतिभासंपन्न कवियत्री मानसी चापेकर यांच्या हळुवार मनाची शाई या कवितासंग्रहाचे रविवारी (दि. २३) प्रकाशन झाले. या सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून प्रा. अशोक बागवे, प्रसाद कुलकर्णी, प्रकाशक संजय शिंदे, कवी जनार्दन म्हात्रे उपस्थित होते. संवेदनाशी आणि हळव्या मनाची असलेली ही कवियत्री निसर्ग प्रेम आणि अनेक नातेसंबंध यावरती उत्तम लिखाण करते मानसी चापेकर यांचा मला हेवा वाटतो असे गौरवोद्गार प्रा. अशोक बागवे यांनी काढले. प्रसाद कुलकर्णी, यांनी मानसी चापेकर हिला कस्तुरी मृग असे म्हणून तिच्यापाशी उत्तम अभिव्यक्ती आहे. तिने उत्तरोत्तर उत्तम लिखाण करावे व वाचन करावे, असे सुचवले.

### वरसगाव येथील शाळेत विविध कार्यक्रम



**रोहे** : वरसगाव येथील एमडीन फ्यूचर शाळेत ईद व इंग्रजी भाषा दिवस मोठ्या आनंदपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या वेळी एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर देवेंद्र, शाळेच्या मुख्याध्यापिका योगिनी देशमुख उपस्थित होत्या. पालक वर्गाची उपस्थिती होती. विद्यार्थ्यांनी ईदनिमित्त शुभेच्छा दिल्या आणि नाटिका व नृत्य सादर केले. शाळेतर्फे पालकांना व विद्यार्थ्यांना शीर-खुर्मा देऊन आनंद साजरा केला. इंग्लिश भाषा दिवस शाळेच्या विद्यार्थ्यांनी वेगवेगळे उपक्रम राबवून साजरा केला.

### सुभाष दळवी, विजय मेथा यांना पुरस्कार




**माणगाव** : रोह्यातील वरसे गावचे उद्योजक सुभाष दळवी व माणगावचे उद्योजक विजय मेथा यांना अविष्कार फाउंडेशनतर्फे महाराष्ट्र रत्न गौरव पुरस्कार जाहीर झाला असल्याची माहिती जिल्हा कार्याध्यक्ष तथा निवड समितीचे सदस्य शंकर शिंदे गुरुजी यांनी दिली. या पुरस्काराचे वितरण ३० एप्रिल रोजी पन्हाळा येथे होणार आहे. उद्योजक सुभाष दळवी व विजय मेथा यांची पुरस्कारासाठी निवड झाल्याने त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

### शिवशांती स्नेहालय वृद्धाश्रमातर्फे व्याख्यान

**अलिबाग** : शिवशांती स्नेहालय वृद्धाश्रम व विरंगुळा केंद्र, अलिबागच्या वतीने रविवारी (दि. २३) श्रीबाग येथे त्वचारोगज्ज्ञ डॉ. किरण नाबर यांचे ॲलर्जीमुळे होणारे त्वचाविकार याबाबत व्याख्यान आणि त्वचारोग तपासणीचे आयोजन करण्यात आले. या वेळी ६० ज्येष्ठांनी व्याख्यानाचा लाभ करून घेतला आणि आपली त्वचारोग तपासणीही करुन घेतली. या वेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुभाष म्हात्रे, सहसचिव प्रफुल्ल राऊत, खजिनदार जगदीश थळे, भारती तरे, ॲड. मनोज पडते, डॉ. प्रशांत जन्नावार, डॉ. सुरेश म्हात्रे, डी. डी. नाईक, गजेंद्र दळी, श्रीरंग घरत, साहित्यिक उमाजी केळुसकर उपस्थित होते.

# पेण आरटीओ खात्याची कोटींची उड्डाणे

## १०० कोटींहून अधिक मिळविले उत्पन्न




**पेण : प्रतिनिधी**

महसूल विभागानंतर सर्वांत मोठे आर्थिक महसूल गोळा करणारे शासकीय कार्यालय म्हणून उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे पाहिले जाते. रायगड आरटीओ कार्यालयाने वर्षभरात १०६ कोटींहून अधिक उत्पन्न मिळवले आहे, तर २५ हजारांहून अधिक वाहनांची नोंदणी करण्यात यश प्राप्त केले आहे.

रायगड परिवहन विभागाचे सुमारे ७० टक्के काम हे ऑनलाईन पद्धतीने होत असल्याने बरीच कामे ही हलकी झाली आहेत, तर अनेक ग्राहकांना ऑनलाईन पद्धतीने सर्व गोष्टी करता येत असल्याने त्यांचेदेखील काम सोपे झाले आहे. शिकाऊ परवाना, परवाना माहिती, दुय्यम परवाना, वाहनांच्या नोंदणी प्रमाणपत्रातील बदल, मोबाईल नंबर अद्ययावत करणे, दुय्यम कंडक्टर परवाना, कर्ज बोजा उतरवणे, वाहन हस्तांतरण (कर्ज नसलेले), वाहनांची तात्पुरती नोंदणी आदी गोष्टी या ऑनलाईन पद्धतीने होत असल्याने घरबसल्या ग्राहकांची परिवहन कार्यालयातील कामे होत आहेत. त्यामुळे साहजिकच परिवहन विभागाला चांगल्या प्रकारे उत्पन्न प्राप्त झाले आहे.रायगड परिवहन कार्यालयाने वर्षभरात १७,७६० दुचाकी, ३,९८४, चारचाकी, तर २,५३९ परिवहन व इतर वाहने याशिवाय इलेक्ट्रिक वाहनांचा विचार करता १,०८९ दुचाकी वाहने, ४७ चारचाकी वाहने, तीन प्रवासी रिक्षा, पाच माल वाहतूक रिक्षा, अशा एकूण १,१४४ इलेक्ट्रिक वाहनांची नोंद झाली आहे. म्हणजेच साधी वाहने आणि इलेक्ट्रिक वाहने असे एकूण २५ हजार ४२७ नव्या वाहनांची नोंदणी झाली आहे. या वर्षभरात एकूण १०६.५० कोटी रुपयांच्या कराची नोंद केली आहे. १०२.२५ कोटी रुपयांची वसुलीदेखील करण्यात आली आहे. यामध्ये दुचाकी वाहनांच्या माध्यमातून १७ कोटी ७४ लाख २२ हजार १७५ रुपये, चारचाकी वाहनांच्या माध्यमातून ४१ कोटी ५६ लाख ३२ हजार ८७५ रुपये, तर परिवहन व इतर वाहनांच्या माध्यमातून १९ कोटी ३७ लाख ३८ हजार ५२९ रुपये कर प्राप्त झाला आहे.

पेण उपप्रादेशिक परिवहन कार्यालय फक्त वाहनांच्या नोंदणीमार्फतच कर प्राप्त करून शांत बसले नाही तर त्यांनी वर्षभरात सात कोटी ७१ लाख १७ हजार ८९९ रुपयांची दंडात्मक वसुली करून आपल्या शासकीय तिजोरीत आर्थिक भर टाकली आहे.

| इलेक्ट्रिक वाहन नोंदणी सामान्य | |
|---|---|
| दुचाकी इलेक्ट्रिक वाहने | १०८९ |
| चारचाकी इलेक्ट्रिक वाहने | ४७ |
| प्रवासी इलेक्ट्रिक रिक्षा | ३ |
| माल वाहतूक इलेक्ट्रिक रिक्षा | ५ |

**जमा झालेला कर**

* दुचाकी मोटार वाहन कर –१७ कोटी ७४ लाख २२ हजार १७५ रुपये
* चारचाकी मोटारवाहन कर – ४१ कोटी ५६ लाख ३२ हजार ८७५ रुपये
* परिवहन व इतर मोटारवाहन कर – १९ कोटी ३७ लाख ३८ हजार ५२९ रुपये

एकूण दंड वसुली – ७ कोटी ७१ लाख १७ हजार ८१९ रुपये

## खोपोली पोलीस ठाण्यातर्फे कृतज्ञता सोहळा



**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे महामार्गासह शहरात होणाऱ्या विविध अपघातांच्या वेळी मदतीला धावून येणाऱ्या सामाजिक संस्थांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी खोपोली पोलिसांतर्फे कृतज्ञता सोहळा कॅम्पोलियन क्लब येथे आयोजित करण्यात आला होता.

खंडाळा घाटात १५ एप्रिल रोजी मुंबई येथील ढोल-ताशा पथकाच्या बसला भीषण अपघात होऊन, या दुर्घटनेत १३ जणांचा मृत्यू त्याचप्रमाणे २८ जण जखमी झाले होते, अपघात समयी अनेक सामाजिक संस्था मदतीसाठी धावून आल्या. यात अपघातग्रस्त मदत टीम, सहज सेवा फाउंडेशन, त्याचप्रमाणे इतर सामाजिक संस्था, विविध राजकीय पक्षांचे कार्यकर्ते, शहरातील खासगी सेवा देणाऱ्या डॉक्टर, नगर परिषदेत रुग्णालयातील डॉक्टर व कर्मचारी यांनी तातडीने मदतकार्य व उपचार सुरू केले. त्याबद्दल पोलीस प्रशासनातर्फे त्यांचे आभार मानण्यात आले.

या कृतज्ञता सोहळ्याला रायगड पोलीस अधीक्षक सोमनाथ घारगे, तहसीलदार आयुब तांबोळी, खोपोली पोलीस निरीक्षक शिरीष पवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक हरेश काळशेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्यासह डॉ. सतीश जाखोटिया, डॉ. प्रमोद वानखेडे, डॉ. श्रीकांत पाटील, डॉ. बी. के. नागरगोजे आदींसह डॉक्टर मंडळींना व संस्थांच्या प्रमुखांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. या वेळी डॉक्टरांनीही पोलिसांचे आभार व्यक्त केले.

## आपली योग्यता सिद्ध केल्यास यश मिळतेच –डॉ. वसीम फोपळूणकर



**पेण : प्रतिनिधी**

कुठल्या क्षेत्रात आपली योग्यता सिद्ध केल्यास यश आपोआप आपल्या पायाशी येते असे प्रतिपादन प्रसिद्ध कॅन्सर तज्ज्ञ डॉ. वसीम फोपळूणकर यांनी पेणमध्ये झालेल्या मुस्लिम समाजाच्या मेळाव्यात केले.

हजरत ख्वाजा सय्यद शहा बद्रुद्दीन वेल्फेअर सोसायटीच्या वतीने ईद ए मिलननिमित्त सामाजिक कार्यकर्ते रशादशेठ मुजावर यांच्या संकल्पनेतून पेणमधील मुस्लिम समाजातील नागरिकांच्या मेळाव्याचे आयोजन एस. आर. फार्महाऊस येथे करण्यात आले होते. या वेळी विविध क्षेत्रात प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभ व मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा उद्योग केंद्रातील अधिकारी महंमद रफिक पटेल, प्रमुख मार्गदर्शक म्हणून ज्येष्ठ कॅन्सर तज्ज्ञ डॉ. वसीम फोपळूणकर, अब्दुल कय्युम दाखवे आदींसह शब्बीर मुजावर, हमीद पठाण, जाकीरहुसेन अत्तार, ॲड. अहद अधिकारी, हुजेफा कांचवाला, झैन नाईक आदी उपस्थित होते.

या वेळी डॉ. वसीम फोपळूणकर यांनी सांगितले की, समाजातील मुलांमध्ये शैक्षणिक ज्ञान व धार्मिक ज्ञान हे विखुरले गेले आहे. यासाठी शैक्षणिक ज्ञान व धार्मिक ज्ञान एका छताखाली होणे गरजेचे आहे. यासाठी समाजातील जाणत्या व्यक्तींनी पुढाकार घेणे गरजेचे आहे. जिल्हा उद्योग केंद्रातील अधिकारी महंमद रफिक पटेल यांनी जिल्हा उद्योग केंद्रातून कशाप्रकारे शासनाच्या विविध योजनांमधून लघुउद्योग, वाहन, अशा विविध योजनांसाठी कर्ज घेऊ शकता याचे मार्गदर्शन समाजातील विद्यार्थ्यांना केले. यासाठी समाजातील विद्यार्थ्यांना शासनाच्या विविध योजनांची माहिती करून घेणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

अब्दुल कय्युम दाखवे यांनी, समाजातील मंडळींनी तरुणांना योग्य दिशा देणयासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे. शैक्षणिक ज्ञान असणाऱ्या विद्यार्थ्यांना शासनाच्या योजनांची माहितीच नसते यामुळे तरुणवर्ग नोकरीत मागे पडला आहे. वाचन संस्कृती जपणे महत्त्वाचे असल्याचे सांगितले.

या वेळी ॲड. अहद अधिकारी, हबीब खोत, तौसिफ पालोबा, शादाब भाईजी यांनीही विद्यार्थ्यांना व पालकांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन फैय्याज इनामदार यांनी केले, तसेच आभार प्रदर्शन लियाकत मुजावर यांनी केले. रशाद मुजावर यांच्या वतीने स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आली होती.

## जातवैधता प्रमाणपत्रासाठी विशेष मोहीम

**अलिबाग** : २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेशाच्या वेळी जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. याकरिता १ मेपर्यंत विशेष मोहीम राबविली जात आहे.

ज्या विद्यार्थ्यांनी १५ एप्रिलपूर्वी अर्ज दाखल केले आहेत, परंतु अद्याप जात वैधता प्रमाणपत्र मिळाले नाही, अशा विद्यार्थ्यांनी बुधवारी (दि. २६) सकाळी ११.३० वा. वडिलांकडील नातेवाईकांचे मानीव दिनांकापूर्वीची कागदपत्रे व नातेसंबंध सिध्द करण्यासाठी आवश्यक ती सर्व कागदपत्रे मूळ व साक्षांकित छायाप्रतींसह घेवून जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, रायगड कार्यालयात उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## मुरूडमधील विकासकामांची मुख्याधिकाऱ्यांकडून पाहणी

### लवकरच होणार लोकार्पण

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड शहरामधील कोळीवाडा येथील समुद्रालगत बांधण्यात आलेल्या पिंडदान शेड व स्वच्छतागृहाचे लवकरच लोकार्पण होणार असून या कामाची पाहणी नगर परिषद प्रशासक तथा मुख्याधिकारी पंकज भुसे यांनी केली.

या वेळी मनोज पुलेकर, तुषार कदम, अजय पाटील व कोळी बांधव उपस्थित होते. मुरूड-जंजिरा नगर परिषद वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून निधी मंजूर करुन व्हिडीके कन्ट्रकशन यांना मंजूर करण्यात आले होते. या कामाचे भूमिपूजन आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते झाले होते. हे काम प्रगतिपथावर असून लवकरच या कामाचे लवकरच लोकार्पण होणार आहे.



# पक्षप्रवेशाने स्नेहल जगतापांचे राजकीय अस्तित्त्व संपेल

## युवासेना जिल्हाप्रमुख विपुल उभारे यांचे मत

**माणगाव : प्रतिनिधी**



ठाकरे गटात प्रवेश करण्याचा निर्णय स्नेहल जगताप यांचे राजकीय अस्तित्व संपवणारा ठरणार असल्याचे मत युवासेना जिल्हाप्रमुख विपुल उभारे यांनी सोमवारी (दि. २४) माणगाव येथे घेतलेल्या पत्रकार परिषेदेत बोलताना व्यक्त केले.

महाड येथे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत स्व. माणिकराव जगताप यांची कन्या, महाड नगर परिषद नगराध्यक्षा स्नेहल जगताप या आपल्या समर्थकांसह काँग्रेसमधून ठाकरे गटात प्रवेश करणार आहेत. स्नेहल जगताप यांच्या ठाकरे गटात प्रवेश करण्याच्या निर्णयामुळे काँग्रेस पक्ष व स्व. माणिक जगताप यांच्या विचारधारेला मानणाऱ्या काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये नाराजी पसरणार आहे. दुसऱ्या बाजूला काँग्रेस पक्षातून आयात करून स्नेहल जगताप यांना विधानसभेची उमेदवारी देणे ही बाब उद्धव ठाकरेंशी एकनिष्ठ असलेल्या शिवसैनिकांना पचनी पडणारी नाही. एकंदरीत महाड विधानसभा मतदार संघातील काँग्रेस व ठाकरे गटातील कार्यकर्त्यांची नाराजी पाहता स्नेहल जगताप यांचा ठाकरे गटातील प्रवेश त्यांचे राजकीय अस्तित्व संपवणारा ठरणार असल्याचे युवासेना दक्षिण रायगड जिल्हाप्रमुख विपुल उभारे यांनी केले आहे.

आमदार भरत गोगावले यांनी महाड-माणगांव-पोलादपूर मतदारसंघात कोट्यवधींची विकासकामे केली आहेत. त्यामुळे ठाकरे गटाच्या संभाव्य उमेदवार स्नेहल जगताप यांची दमछाक होणार असल्याचेही विपुल उभारे यांनी सांगितले.

उमेदवार कोणीही असो आगामी २०२४ची निवडणूक ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या लोकाभिमुख निर्णयांच्या जोरावर व आमदार भरत गोगावले यांचा विकासकामांचा झंझावात, दांडगा जनसंपर्क, अविरत जनसेवा या मुद्द्यांवर लढवणार असून त्यांना ५०,०००पेक्षा अधिक रेकॉर्डब्रेक मताधिक्यांनी सलग चौथ्यांदा निवडून आणण्यासाठी शिवसेना, युवासेना, महिला आघाडी सर्व आजी-माजी पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, शिवसैनिक तयारीला लागले असल्याचे युवासेना जिल्हाप्रमुख विपुल उभारे यांनी सांगितले.

## मुरूड शहरातील रस्त्यांची कामे प्रगतिपथावर



**मुरूड : प्रतिनिधी**

शहरातील भंडारवाडा, कोळीवाडा, भाजी मार्केट कारेकर गल्ली, तलाठी ऑफीस-आंबुकर रस्ता, बावुलखलाटी, संदिलकर मोहल्ला आदींसह इतर रस्त्यांची कामे सध्या प्रगतीपथावर आहेत. या रस्त्यांच्या कामांची पाहणी प्रशासक तथा मुख्याधिकारी पंकज भुसे यांनी केली.

शहरातील अंतर्गत सिमेंट काँक्रिटचे रस्ते बनविण्याचे काम गुरुकृपा कन्स्ट्रक्शन सांगली दासगांव येथील तुषार कदम व अजय पाटील यांना मिळाला असून सध्या कामे अंतिम टप्प्यात आहेत.

ग्रामस्थांनी रस्त्याची कामे सुरू असल्याने समाधान व्यक्त करून रस्त्याबरोबर गल्लीतील भागही रस्त्याच्या कामात घ्या, असे सांगण्यात आले. प्रशासक तथा मुख्याधिकारी पंकज भुसे यांनी ठेकेदाराला हे काम करण्याचे आदेश दिले.

या वेळी ठेकेदार तुषार कदम, अजय पाटील, मनोज पुलेकर, रुपेश पाटील, जयेश चोडणेकर आदींसह अधिकारी उपस्थित होते.

## दीपक जगताप यांची मंडळ संयोजकपदी निवड



**खालापूर : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, खालापूर मंडळ संपर्क प्रमुख प्रल्हाद केणी व खालापूर तालुका अध्यक्ष रामदास ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मन की बात या कार्यक्रमाचे खालापूर मंडळ संयोजक म्हणून दीपक जगताप यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

जगताप यांना निवडीचे पत्र नुकतेच त्यांना देण्यात आले. या निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## ‘उष्माघातापासून खबरदारी घ्यावी’

**मुरूड : प्रतिनिधी**

वाढत्या तापमानामुळे नागरिकांना त्रास होत आहे. या उष्णतेच्या लाटेपासून वाचण्यासाठी जनतेने खबरदारी घ्यावी, असे आवाहन नगर परिषदेच्या वतीने प्रशासक तथा मुख्याधिकारी पंकज भुसे यांनी केले आहे.

पुरेसे पाणी प्या, ताक, लिंबु पाणी, नारळ पाणी, फळांचे रस असे द्रव्यपदार्थ घ्या, घराबाहेर पडताना डोके झाकण्यासाठी छत्री अथवा टोपीचा वापर करा, दुपारी १२ ते ३ वाजेदरम्यान घराबाहेर जाणे टाळा, प्रवासावेळी पाण्याची बाटली जवळ बाळगा, चप्पल/बूट घालुनच घराबाहेर पडा, हलक्या रंगाचे, पातळ सुती कपडे परिधान करावे, राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या ट्विटर, फेसबुक व कुप वरील सूचना पहाव्यात. रात्रीच्या वेळी खिडक्या उघडाव्यात, जेणेकरून गार हवा आतमध्ये येऊ शकेल, अशा सूचना करण्यात आल्या आहेत.

## डब्ल्यूटीसी फायनलसाठी टीम इंडियाची घोषणा

# रहाणे इन, सूर्या आऊट!



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) जागतिक अजिंक्यपद कसोटी चॅम्पियनशिपसाठी टीम इंडियाची घोषणा केली आहे. डब्ल्यूटीसीच्या अंतिम सामन्याला इंग्लंडमध्ये ७ जूनपासून होणार आहे. यासाठी ऑस्ट्रेलियन संघ आधीच जाहीर झाला होता. आता बीसीसीआयने भारतीय संघ जाहीर केला आहे.

संघाची कमान पुन्हा एकदा रोहित शर्माच्या हाती असेल. आयपीएलमध्ये चेन्नई सुपर किंग्सकडून खेळणात उत्कृष्ट खेळ दाखवणाऱ्या अजिंक्य रहाणेला बीसीसीआयने बक्षीस दिले आहे. त्याला पुन्हा एकदा टीम इंडियाचे तिकीट मिळाले आहे.

डब्ल्यूटीसी फायनल ७ जून ते ११ जूनदरम्यान लंडन येथील ओव्हल मैदानावर खेळली जाणार आहे. यासाठी तब्बल वर्षभरानंतर अजिंक्य रहाणेचे कसोटी संघात पुनरागमन झाले आहे. श्रेयस अय्यरच्या दुखापतीमुळे मधल्या फळीत जागा रिकामी होती. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पहिल्या कसोटीत टीम इंडियाने सूर्यकुमार यादवला स्थान दिले होते, पण तो डाव यशस्वी झाला नाही. त्यामुळे पुन्हा एकदा निवड समितीने वरिष्ठ खेळाडू रहाणेवरच विश्वास व्यक्त केला आहे. यासोबतच रहाणेला आयपीएलमधील चमकदार कामगिरीचे बक्षीसही मिळाले आहे.

अशातच महत्त्वाची बाब म्हणजे ऑस्ट्रेलियाविरुद्ध खराब कामगिरी करूनही सर्वंच्या टीकेचा धनी झालेला केएल राहुलला टीम इंडियातील जागा वाचवण्यात यश आले. निवड समितीने विकेटकीपिंगसाठी केएस भरतवरच विश्वास व्यक्त केला आहे, मात्र मधली फळी आणखी मजबूत करण्यासाठी कर्णधार रोहित हा राहुलकडे यष्टीरक्षणाची जबाबदारी देणार का हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे. दुखापतग्रस्त ऋषभ पंत, श्रेयस अय्यर आणि जसप्रीत बुमराह यांना टीम इंडियात स्थान मिळालेले नाही.

**असा आहे संघ**

रोहित शर्मा (कर्णधार), शुबमन गिल, चेतेश्वर पुजारा, विराट कोहली, अजिंक्य रहाणे, केएल राहुल, केएस भरत (यष्टीरक्षक), आर. अश्विन, रवींद्र जडेजा, अक्षर पटेल, मोहम्मद शमी, मोहम्मद सिराज, शार्दुल ठाकूर, उमेश यादव, जयदेव उनाडकट.

## दिल्लीचा हैदराबादवर निसटता विजय



**हैदराबाद : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये सोमवारी झालेल्या अटीतटीच्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने सनरायझर्स हैदराबादवर मात केली. दिल्लीने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करीत २० षटकांत आठ बाद १४४ धावा केल्या होत्या. या आव्हानाचा पाठलाग करताना हैदराबाद संघ २० षटकांत सहा विकेट्स गमावत १३७ धावा करू शकला.

१४५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना हैदराबादची सुरुवातही चांगली झाली नाही. हॅरी ब्रूक पुन्हा अयशस्वी ठरला आणि तो सात धावा करून बाद झाला. मयंक अग्रवालचाने ४९ धावांची खेळी खेळली. पॉवरप्लेमध्ये हैदराबादने १ गडी गमावून ३६ धावा केल्या, पण त्यानंतर संघाने ठराविक अंतराने विकेट गमावल्या आणि सामना गमावला.

प्रथम फलंदाजी करताना दिल्लीची सुरुवात खूपच खराब झाली होती. पहिल्याच षटकात भुवनेश्वरने फिलिप सॉल्टला यष्टिरक्षक क्लासेनवी झेलबाद केले. यानंतर कर्णधार डेव्हिड वॉर्नर आणि मिचेल मार्श यांनी दुसऱ्या विकेटसाठी ३८ धावांची भागीदारी केली. मार्शने १५ चेंडूत पाच चौकारांच्या मदतीने २५ धावा केल्या.

यानंतर वॉशिंग्टन सुंदरची घातक गोलंदाजी पाहायला मिळाली. आठव्या षटकात त्याने तीन बळी घेतले. सर्वप्रथम सुंदरने वॉर्नरला हॅरी ब्रूककरवी झेलबाद केले. त्याने २० चेंडूंत २१ धावा केल्या. सर्फराजला नऊ चेंडूत १० धावा करता आल्या. त्याच षटकाच्या शेवटच्या चेंडूवर अमन हकीम खानही बाद झाला. ६२ धावांत पाच विकेट पडल्यानंतर मनीष पांडे आणि अक्षर पटेल यांनी सहाव्या विकेटसाठी ६० चेंडूत ६९ धावांची भागीदारी केली. पटेलने ३४ चेंडूंत ३४ धावा केल्या. यानंतर पांडे धावबाद झाला. त्याला २७ चेंडूंत दोन चौकारांच्या मदतीने ३४ धावा करता आल्या.

भुवनेश्वरने चार षटकांत ११ धावा देत दोन बळी टिपले. त्याचवेळी वॉशिंग्टन सुंदरने चार षटकांत २८ धावा देत तीन गडी बाद केले. टी. नटराजनने तीन षटकांत २१ धावा देत मिचेल मार्शची विकेट घेतली.

## वॉर्नरने धरले भुवीचे पाय; व्हिडीओ व्हायरल



**हैदराबाद : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये सोमवारी सनरायझर्स हैदराबाद आणि दिल्ली कॅपिटल्स आमनेसामने आले होते. हा सामना राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळला गेला. या सामन्यापूर्वीचा एक व्हिडिओ आयपीएलने शेअर केला आहे, जो सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये डेव्हिड वार्नरने भुवनेश्वर कुमारच्या पाया पडताना दिसत आहे.

आयपीएल २०२२पर्यंत वेगवान गोलंदाज भुवनेश्वर कुमार आणि डेव्हिड वार्नर हे दोघेही हैदराबाद संघासाठी खेळत होते. हैदराबाद संघाने २०२३ हंगामाच्या लिलावापूर्वी वॉर्नरला मुक्त केले, परंतु भुवनेश्वर कुमारला कायम ठेवले. त्यानंतर दिल्लीने वॉर्नरला खरेदी करून संघाचा कर्णधार बनवले. दोघेही वेगवेगळ्या संघासाठी खेळत असले तरी त्यांची मैत्री पूर्वीसारखीच आहे. या गोष्टीचा प्रत्यय म्हणजे आयपीएलने शेअर केलेला व्हिडीओ आहे.

आयपीएलने शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये इशांत शर्मा आणि भुवनेश्वर कुमार मैदानात गप्पा मारत उभा आहेत. तितक्यात वॉर्नर धावत येऊन भुवनेश्वर कुमारच्या पाया पडतो. यानंतर भुवनेश्वर त्याला उठवतो आणि त्याची गळाभेट घेतो. त्यानंतर ते एकमेकांसोबत गप्पा मारू लागतात. या घटनेचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

## विराट कोहलीसह संघाला ठोठावला दंड

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा कार्यवाहक कर्णधार विराट कोहलीने सलग दोन सामन्यांत संघाला विजय मिळवून दिला आहे. त्याने आयपीएलमध्ये १८ महिन्यांनंतर पंजाब किंग्ज आणि राजस्थान रॉयल्स संघाविरुद्ध सामन्यात नेतृत्व केले, मात्र बंगळुरू येथील एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर राजस्थानविरुद्धच्या सामन्यात षटकाचा वेग कमी ठेवल्याबद्दल विराटला दंड ठोठावण्यात आला आहे.

या वेळी हा दंड केवळ संघाच्या कर्णधारालाच नाही तर संपूर्ण संघाला लावण्यात आला आहे. विराटला २४ लाखांचा दंड ठोठावण्यात आला आहे. त्याचबरोबर आरसीबीच्या इतर खेळाडूंनाही ही शिक्षा झाली भोगावी लागत आहे. आयपीएलने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, आरसीबी संघ राजस्थानविरुद्ध वेळेवर पूर्ण षटके



टाकू शकला नाही. संघाने हंगामात दुसऱ्यांदा असे केले आहे.

लखनऊ सुपरजायंट्सविरुद्धच्या पराभवानंतर बंगळुरूचा कर्णधार फाफ डुप्लेसिसला दंड ठोठावण्यात आला होता. संघाच्या दुसऱ्या चुकीमुळे या वेळी मोठा दंड ठोठावण्यात आला आहे. आता संघाने पुन्हा एकदा ही चूक केली, तर कर्णधारावर एक किंवा अधिक सामन्यांची बंदी घातली जाऊ शकते.

अशा परिस्थितीत विराटने आगामी सामन्यात कर्णधारपद भूषवल्यास त्याला काळजी घ्यावी लागेल, अन्यथा त्याला मोठी शिक्षा होऊ शकते. विराट हा सामन्यात काही वेळेस खूप आक्रमक होतो. तो त्याचा आनंदावर ताबा ठेवू शकत नाही. त्यामुळे यावरही आयपीएल कारवाई करण्याची शक्यता आहे.

## शिवीगाळीनंतर सिराजने मागितली सहकारी खेळाडूची माफी



**बंगळुरू : वृत्तसंस्था**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा स्टार गोलंदाज मोहम्मद सिराज उत्कृष्ट फॉर्ममध्ये दिसत आहे. अशातच त्याने लाईव्ह मॅचदरम्यान सहकारी खेळाडूला शिवीगाळ केल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला. त्यानंतर त्याने आपल्या सहकारी खेळाडूची माफी मागितली आहे.

चिन्नास्वामी स्टेडियमवर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात झालेल्या सामन्यात एक अशी घटना घडली, ज्यामुळे सिराजला राग अनावर झाला. तो सहकारी महिपाल लोमरोरवर चांगलाच चिडला व त्याने लोमरोरला शिवीगाळ केली.

या घटनेनंतर सिराजने खुलेआम माफीही मागितली आहे. मी खूप रागीट माणूस आहे. महिपाल, कृपया मला माफ कर. मी दोनदा माफी मागितली आहे. तो राग फिल्डपर्यंतच राहतो. त्यानंतर माझा राग शांत होतो, असे सिराज म्हणाला.

दरम्यान, व्हिडीओमध्ये सिराज हा काय नाव त्याचे महिपाल, असे उच्चारताना दिसत आहे. आपल्याच संघातील खेळाडूचे नाव सिराजला माहीत कसे नाही, असा सवाल आता नेटकरी विचारताना दिसत आहेत.

## अखेरच्या टी-२० सामन्यात न्यूझीलंडची पाकिस्तानवर मात

**कराची : वृत्तसंस्था**

पाच सामन्यांच्या ट्वेन्टी-२० मालिकेतील अखेरचा सामना जिंकून न्यूझीलंडच्या संघाने यजमानांच्या तोंडचा घास पळवला. पाकिस्तानी संघ सध्या मायदेशात न्यूझीलंडविरूद्ध टी-२० मालिका खेळत आहे. या मालिकेतील अखेरच्या सामन्यात पाहुण्या न्यूझीलंडने शानदार विजय मिळवला. मालिकेतील सुरूवातीचे दोन सामने जिंकून यजमान संघाने २-०ने आघाडी घेतली होती. तर तिसरा सामना पावसाच्या व्यत्ययामुळे रद्द करण्यात आला. अखेरचे दोन्ही सामने जिंकून 'किवी' संघाने २-२ अशी मालिकेत बरोबरी साधली आणि पाकिस्तानच्या स्वप्नांचा चुराडा केला.



मालिकेतील पहिले दोन सामने जिंकल्यामुळे पाकिस्तानी संघ सहज मालिका जिंकेल असे अपेक्षित होते, कारण न्यूझीलंडच्या संघाचे वरिष्ठ खेळाडू आयपीएलमध्ये व्यस्त आहेत. त्यामुळे युवा खेळाडूंना किवी संघात संधी मिळाली आहे. पण असे असतानादेखील पाकिस्तानला आपल्या घरात मालिका गमवावी लागली.

### मालिका बरोबरीत

पाकिस्तानी कर्णधार बाबर आझमने दुसऱ्या सामन्यात शतक ठोकून पाहुण्या संघाचा दारूण पराभव केला होता. त्यानंतर यजमान संघाला प्रभावी कामगिरी करता आली नाही आणि अखेर मालिका गमवली.

अखेरच्या सामन्यात नाणेफेक गमावल्यानंतर पाकिस्तानने प्रथम फलंदाजी करताना निर्धारित २० षटकांत ५ बाद १९३ धावा केल्या. सलामीवीर मोहम्मद रिझवानने ६२ चेंडूत ९८ धावांची शानदार खेळी केली. १९४ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना किवी संघाची सुरुवात निराशाजनक झाली. कर्णधार टॉम लॅथम (०), चाड बोवेस (१९), डेरी मिचेल (१५) विल यंग (४) स्वस्तात माघारी परतले, पण त्यानंतर मार्क चॅपमन शो सुरू झाला आणि त्याने पाकिस्तानी गोलंदाजांना घाम फोडला. त्याने ५७ चेंडूंत १०४ धावांची नाबाद शतकी खेळी केली आणि संघाला विजय मिळवून दिला. जिमी नीशमने २५ चेंडूत ४५ धावा करून चॅपमॅनला साथ दिली. न्यूझीलंडच्या संघाने १९.२ षटकांत १९४ धावा करून विजय मिळवला आणि पाच सामन्यांच्या मालिकेत २-२ अशी बरोबरी साधली. टी-२० मालिकेनंतर २६ एप्रिलपासून दोन्ही संघांमध्ये वन डे मालिका खेळवली जाणार आहे.

## सचिनच्या नावाने 'एससीजी'मध्ये गेट

**सिडनी : वृत्तसंस्था**

भारताचा महान क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरच्या ५०व्या वाढदिवसाच्या निमित्ताने प्रतिष्ठित सिडनी क्रिकेट ग्राऊंडवर (एससीजी) सोमवारी त्याच्या नावाच्या गेटचे अनावरण करण्यात आले.

सचिन सोमवारी ५० वर्षांचा झाला. सचिनने 'एससीजी'वर पाच कसोटी सामन्यांत १५७च्या सरासरीने ७८५ धावा केल्या. यामध्ये नाबाद २४१ ही त्याची सर्वोत्तम खेळी होती. तेंडुलकरने भारताबाहेर 'एससीजी' हे आपले आवडते मैदान असल्याचे म्हटले.

'भारताबाहेर सिडनी क्रिकेट ग्राऊंड हे माझे आवडते मैदान आहे. ऑस्ट्रेलियाच्या १९९१-९२च्या माझ्या पहिल्या दौऱ्यात या मैदानावर माझ्या खास आठवणी आहेत,' असे सचिनने 'एससीजी'च्या निवेदनात म्हटले आहे. 'एससीजी'ने ब्रायन लाराच्या २७७ धावांच्या खेळीला ३० वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर वेस्ट इंडिजच्या या दिग्गज फलंदाजाच्या नावावरही एका गेटचे अनावरण केले. या दोन्ही गेटचे अनावरण 'एससीजी'चे अध्यक्ष रॉड मॅकगियोच आणि सीईओ कॅरी माथेर तसेच क्रिकेट ऑस्ट्रेलियाचे सीईओ निक हॉक्ले यांनी केले. खेळाडू आता लारा-तेंडुलकर गेटमधून मैदानात प्रवेश करतील. या गेटवर एक फलक लावण्यात आले असून त्यामध्ये दोन्ही खेळाडूंच्या कामगिरी आणि 'एससीजी'वर त्यांच्या विक्रमाचे वर्णन करण्यात आले आहे.

तेंडुलकर व लारा आता डॉन ब्रॅडमन, ॲलन डेव्हिडसन व आर्थर मॉरिस यांच्या क्लबमध्ये सहभागी झाले आहेत. या सर्व खेळाडूंच्या नावे 'एससीजी'मध्ये गेट आहे.




**ही माझ्यासाठी सन्मानाची गोष्ट आहे. 'एससीजी'मध्ये खेळाडू या गेटचा वापर करतील, ज्यावर माझे आणि माझा चांगला मित्र ब्रायनचे नाव आहे. मी याकरिता 'एससीजी'आणि क्रिकेट ऑस्ट्रेलियाचे आभार मानतो. लवकरच 'एससीजी' मी दौरा करेन.**

**-सचिन तेंडुलकर**

## 'विरूष्का'ने लुटला बॅडमिंटनचा आनंद





**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संघाचा माजी कर्णधार विराट कोहली सध्या आयपीएलमध्ये व्यस्त आहे. फाफ डुप्लेसिस पूर्णपणे तंदुरुस्त नसताना तो रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचे कर्णधारपदही सांभाळत आहे, मात्र या सर्व गोष्टींमध्ये तो आपल्या कुटुंबासाठीही वेळ काढताना दिसत आहे. नुकताच तो पत्नी अनुष्का शर्मासोबत एका प्रमोशनल इव्हेंटमध्ये दिसला. या स्पर्धेत विराट कोहली आणि अनुष्का शर्मा बॅडमिंटन खेळले.

विराट व अनुष्का दोघेही मिश्र संघ म्हणून खेळत होते, तर विरुद्ध संघातील खेळाडू त्यांचा सामना करत होते. दोघांच्याही चाहत्यांना हा व्हिडीओ खूप आवडला असून चाहते सोशल मिडीयावर खूप लाईक आणि शेअर करीत आहेत.

विराट कोहली आणि अनुष्का शर्मा यांनी यापूर्वी अनेक जाहिरातींमध्ये एकत्र काम केले आहे. २०१३मध्ये एका जाहिरातीच्या शूटिंगदरम्यान दोघे पहिल्यांदा भेटले होते. यानंतर दोघांची मैत्री झाली आणि नंतर या मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले. २०१७ मध्ये लग्नानंतर दोघेही एका मुलीचे आई-वडील झाले आहेत, तिचे नाव वामिका आहे. विराट आणि अनुष्काने लग्नाआधी आणि नंतरही अनेक जाहिरातींमध्ये एकत्र काम केले आहे. आता पुन्हा एकदा दोघेही जाहिरातीत एकत्र काम करताना दिसणार आहेत.

## डेव्हिड वॉर्नरवर दंडात्मक कारवाई

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दिल्ली कॅपिटल्सचा कर्णधार डेव्हिड वॉर्नरवर सनरायझर्स हैदाबादविरुद्ध सोमवारी झालेल्या सामन्यात स्लो ओव्हर रेटिंगमुळे १२ लाखांची दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. दिल्लीने या सामन्यात सनरायझर्सचा सात धावांनी पराभव केला.

आयपीएलने प्रतिक्रिया देत म्हटले की, स्लो ओव्हर रेटिंगमुळे आयपीएल आचारसंहितेनुसार १२ लाखांचा दंड ठोठावण्यात आला आहे. सामना तीन तास आणि २० मिनिटांत संपवण्याचा आयपीएलचा उद्देश आहे, पण स्लो ओव्हर्समुळे काही सामने चार तासांहून अधिक तास खेळवले जात आहेत. त्यांच्यावर कारवाई सुरू केली जाईल.

## सचिनने कोकणात साजरा केला वाढदिवस

**मालवण : प्रतिनिधी**

मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर याने सोमवारी (दि. २४) वयाचे अर्धशतक पूर्ण केले. आश्चर्याची बाब म्हणजे सचिनने आपला वाढदिवस कोणत्याही आलिशान जागेवर किंवा डेस्टीनेशनवर वाढदिवस साजरा न करता कोकणातल्या भोगवे येथील समुद्रकिनारी असलेल्या हॉटेलमध्ये साधेपणाने साजरा केला.

क्रिकेटचा देव त्याच्या वाढदिवसाच्या निमित्ताने मित्र आणि कुटुंबीयांसमवेत देवभूमी कोकणात पोहचला. सिंधुदुर्गातील भोगवे समुद्रकिनारी असलेल्या कोकोश्यामबाला हाटॅलेमध्ये त्याने मुक्काम केला आणि ब्लू फ्लॅग मानांकन मिळालेल्या



भोगवे किनारी फेरफटका मारला. या वेळी तेथे आलेल्या पर्यटकांच्या इच्छेला मान देत त्याने त्यांच्यासोबत फोटोदेखील काढले. त्याचसोबत परुळे येथील माचली रिसॉर्टला सचिन, पत्नी अंजली तेंडुलकर, कन्या सारा तेंडुलकर आणि सचिनच्या मित्रांनी भेट दिली. माचली रेस्टॉरंटमध्ये त्यांनी मालवणी जेवणावर ताव मारला. हे रेस्टॉरंट सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ले तालुक्यातील परुळे गावात आहे. यानिमित्ताने सचिनने कुटुंबीय व मित्रमंडळींसह गाण्यांच्या मैफिलीचाही आनंद लुटला.

### लज्जतदार जेवणाचा घेतला आस्वाद

भरलेला बांगडा, कोळंबी फ्राय, माशाचा मालवणी तिखला कोंबडी रस्सा, वडे-सागोती, गोलमा अशा अस्सल झणझणीत मांसाहारी मालवणी पदार्थांवर यथेच्छ ताव मारत खवैय्या सचिन तेंडुलकरने या सुग्रास भोजनाला दिलखुलास दाद दिली, तर शाकाहारी पदार्थांमध्ये आमरसासह हापूस आंबे तसेच कैरीचे लोणचे, चटणी, कंदमुळाची भाजी, काजू-शहाळ्याची भाजी, भात, सोलकढी, निरफणसाची कापे, बोंडू रायता अशा पदार्थांची रेलचेल होती. सचिनचे कुटुंब आणि मित्र मिळून सुमारे ३० जणांनी या पंक्तीत एकत्र जेवण घेतले.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com